वर्ष ९ वें अंक १ ला
१५ ऑगस्ट १९५७

संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक

संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

वर्ष ९. अंक १ 		१५ ऑगस्ट, १९५७

संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादक :

भालचंद्र लिमये

संजीवन कार्यालय

श्रीअरविन्द आश्रम, पांडीचेरी

वार्षिक वर्गणी–यथाशक्ति

संपादक—भालचंद्र लिमये.
प्रकाशक—'संजीवन कार्यालय' श्रीअरविन्द आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक—श्रीअरविन्द आश्रम प्रेस, पांडिचेरी
618/57/7/750



संजीवनकरितां श्रीमाताजींनीं दिलेला संदेश

A new world is born — all those who want to have a place in it must sincerely prepare themselves for it.

15.8.57

एक नवीन जग जन्म पावलें आहे——
ज्यांना त्यांत स्थान हवें आहे त्या सर्वांनीं त्याकरितां स्वतःची
अंतःकरणपूर्वक तयारी केली पाहिजे.

१५-८-५७

——श्रीमाताजी

१५ ऑगस्ट १९५७

प्रकाश असा सतत वाढतच जातो. छाया, ती तर केवळ छायाच असून वाढत्या प्रकाशांत ती विरून जाईल.

—श्रीअरविंद

अनुक्रमणिका

विषय		पृष्ठ
१. प्रार्थना आणि ध्यान	श्रीमाताजी	७
२. १५ ऑगस्ट १९४७ चा संदेश	श्रीअरविंद	१०
३. श्रीमाताजींचीं प्रवचनें—		
(१) योग्यवृत्तीचें सामर्थ्य		१३
(२) असत्यावर विजय		१५
(३) खरी विश्रांति		१६
(४) उपवास		१७
४. जीवन व योग	श्रीअरविंद	२०
५. स्वावलंबन	श्रीमाताजी	२३
६. महाभारत आणि रामायण	श्रीअरविंद	२७
७. साधना व बौद्धिक विकास	"	३१
८. विचार-शलाका	"	३५
९. श्रद्धा	"	३७
१०. फुलांचे आध्यात्मिक कार्य	श्रीमाताजी	३९
११. दिव्य जीवन	श्रीअरविंद	४०
१२. साहित्य-सत्कार		४४
१३. आश्रम वृत्त		४७

हे प्रभो, तुझें प्रेम इतकें महान्, इतकें उदात्त व इतकें पवित्र आहे कीं तें आमच्या आकलन शक्तीच्या बाहेर आहे. तें अपरिमेय व अनंत आहे. गुडघे टेंकून, नम्रपणें आम्हीं त्याचा स्वीकार केला पाहिजे; आणि तरीहि तें तूं इतकें मधुर बनविलें आहेस कीं आमच्यांतील अत्यंत दुर्बळ अथवा लहान बालकसुद्धां तुझ्याप्रत पोंहचूं शकेल.

—श्रीमाताजी

CWMCE - Vol 15 : Page 232

वर्ष ९ अंक १ १५ ऑगस्ट १९५७

संजीवन

तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,
देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.

ऋग्वेद–१. ५०. १०

प्रार्थना आणि ध्यान

१९ जानेवारी १९१४

हे प्रभो, हे दिव्य प्रेमाधिनायका,

तूं सनातन विजेता आहेस आणि तुझ्याशीं जे संपूर्ण समस्वरता राखतात, तुझ्याचकरितां आणि तुझ्याच आधारानें जे जगतात त्यांना विजय प्राप्त झाल्याशिवाय रहाणार नाहीं. कारण तुझ्यामध्येंच पूर्ण अनासक्तीची, दिव्य चक्षूंची, निर्दोष आणि सर्वोच्च कनवाळुपणाची परम शक्ति आहे.

तुझ्यामध्यें आणि तुझ्याद्वारां सर्व कांहीं रूपांतरित होऊन जातें, प्रतिष्ठा पावतें; तुझ्यामध्येंच सर्व रहस्यांची व सर्व सामर्थ्यांची किल्ली आहे. परंतु, केवळ तुझ्याचमध्यें जगावें, तुझीच सेवा करावी आणि अधिकांत अधिक लोकांच्या मुक्तीसाठीं तुझेंच दिव्य कर्म अधिक जलद गतीनें यशस्वी करावें या खेरीज दुसरी कोणतीहि इच्छा जेव्हां आम्हांला राहिली नसेल त्याचवेळीं केवळ आम्हांला तुझी प्राप्ति होऊं शकते.

हे प्रभो, केवळ तूंच सत्य आहेस, बाकी सारे कांहीं भ्रम आहे. कारण जेव्हां आम्ही तुझ्यामध्यें निवास करतो त्याचवेळीं सर्व वस्तूंचें खरें स्वरूप आम्हांस दिसतें, आकलन होतें. तुझ्या परिपूर्ण ज्ञानदृष्टींतून कांहींच सुटत नाहीं. त्याठिकाणीं सर्व गोष्टी कांहीं निराळेंच रूप धारण करतात. साररूपानें सारें कांहीं तूंच आहेस, तुझ्याच कार्याचें, तुझ्याच उदार कृपाळू साह्याचें सारें कांहीं फल आहे. घनघोर अंधःकारामध्येंहि तूंच तारका-दीप लावला आहेस.

आमची भक्ति सतत वाढत जाऊं दे.

आमचें आत्मदान नेहमीं अधिकाधिक पूर्ण होत जाऊं दे.

आणि प्रभो, तूं तत्त्वरूपानें परम स्वामी आहेसच पण प्रत्यक्ष कार्यरूपानेंहि तूं आमचा जीवनाधीश व्हावेस अशी आमची प्रार्थना आहे. CWMCE Vol 01 : Page 58

★

२४ जानेवारी १९१४

हे नाथ, हे अस्तित्वाच्या सत्यदेवा, प्रेमप्रभो, तू जीवनाचा उद्धारक आहेस. प्रत्येक क्षणीं आणि प्रत्येक विषयामध्यें तुझ्या भानाखेरीज दुसरें कोणतेंच भान मला राहूं नये. मी ज्यावेळीं सर्वस्वीं तुझ्याच जीवनशक्तीनें संजीवित होऊन रहात नाहीं तेव्हां मला यातना होतात. क्षणोक्षणीं मी खालीं खाली जाऊन नाहींशी होऊं लागते; कारण माझ्या अस्तित्वाचें तूंच एक कारण आहेस; तूंच माझें ध्येय आणि तूच माझा आधार! स्वतःच्या पंखांवर अजून विश्वास नसलेल्या आणि म्हणून उडण्यास धीर होत नसलेल्या चिमुकल्या भित्र्या पिलाप्रमाणें मी आहे.

प्रभो, मला उडण्याची, उंच भरारी मारण्याची शक्ति दे. म्हणजे अंतीं तुझ्याशीं मी तादात्म्य करून घेऊं शकेन. CWMCE Vol 01 : Page 59

★

२९ जानेवारी १९१४

हे दिव्य प्रेमाधिपते, प्रत्येक प्राणिमात्रामध्यें तुझी उपस्थिति असल्यामुळेंच प्रत्येक मनुष्य, अगदीं क्रूरांत क्रूर मनुष्यहि दयाशील होऊं शकतो आणि अत्यंत दुष्ट मनुष्यहि स्वतःची इच्छा नसतांहि उच्चता आणि न्याय यांचा आदर राखतो. सर्व सामाजिक रूढी आणि पक्षपात यांच्या अतीत राहून, एका विशेष, दिव्य आणि पवित्र प्रकाशद्वारां, 'आम्ही काय आहोंत आणि आम्ही काय करतो' हें तूंच आम्हांला दाखवितोस. त्याचप्रमाणें आम्ही काय साध्य करून घेतलें आहे व आम्हांला वास्तविक काय साध्य करतां आलें असतें यांतील अंतरहि तूंच आम्हांला दाखवितोस.

आत्यंतिक पाप, अंधता आणि दुष्टता यांच्या विरुद्ध बाजूची अनुल्लंघनीय सीमा तूं आहेस; संभवनीय आणि भावी पूर्णतेची, प्रत्येक हृदयांतील जिवंत जागती आशा तूं आहेस.

तुझ्याचसाठीं आहे माझ्या भक्तीची सारी उत्कटता.

हळुहळु आमच्यासमोर जें वैभव प्रकट केलें जाणार आहे अशा अचिंत्य आणि अपूर्व वैभवाकडे आम्हांस नेऊन सोडणारें, आमच्या मानसिक कल्पनांनीं आम्ही जेथें पोहोचूं असें महाद्वार तूं आहेस. CWMCE Vol 01 : Page 60

★

३० जानेवारी १९१४

हे प्रभो,

माझ्यामध्यें जें जें कांहीं जाणीवयुक्त आहे तें तें सारें निःसंकोचपणें मीं तुला देऊन टाकलें आहे;

आणि जागृत जीवनाच्या तळाशीं आधारभूत भूमीप्रमाणें असलेला, अजूनहि अंधःकारमय असा अवचेतन भाग हळुंहळुं आणि उत्तरोत्तर अधिक जिंकण्याची मी कसोशी करणार आहे. हे प्रेममय दिव्यस्वामी, शाश्वत गुरुदेवा, तूंच आमच्या जीवनाला मार्गदर्शन करतोस. तुझ्यामध्येंच आणि तुझ्या प्रीत्यर्थंच केवळ आम्ही जीवन जगूं; आमची जाणीव उज्वलित कर, आमच्या पायांना वाट दाखव, आम्हांला जें कांहीं अधिकांत अधिक करणें शक्य आहे तें सारें, आमच्या सर्व शक्ती, केवळ तुझ्याच सेवेसाठीं आम्ही उपयोगांत आणूं असें आम्हांला वरदान दे.

CWMCE Vol 01 : Page 61

★

३१ जानेवारी १९१४

हे प्रभो,

आम्ही अशी इच्छा करतो कीं दररोज प्रातःकाळीं आर्ततेनें आम्ही तुझाच विचार करावा, चिंतन करावें आणि तुझा आविष्कार करण्यासाठीं व तुझी सेवा करण्यासाठीं आम्हांस अधिकांत अधिक काय करणें शक्य आहे तें तुला विचारावें. प्रतिक्षणीं आम्हांस अनेक तऱ्हेचे निर्णय घेतां येणें शक्य असतें, वरवर पाहतां त्यांना फारसें महत्त्व नसतें; तरी वास्तविक नेहमींच ते अत्यंत महत्त्वपूर्ण असतात. कारण या निर्णयानुसार, या नाहींतर त्या, कोणत्यातरी प्रकारच्या दैववादाला आम्ही शरण जात असतो. हे निर्णय घेत असतांना प्रत्येक क्षणीं आमची अशी मनोवृत्ती राहूं दे कीं, ज्यामुळें आमचा निर्णय तुझ्या दिव्य इच्छेनुसार घेतला जाईल; व अशा रीतीनें तूच आमच्या अखिल जीवनाला दिशा लावशील. निर्णय घेत असतांना त्या क्षणीं आम्ही जाणीवेच्या, चेतनेच्या ज्या पातळीवर असतो त्यानुसार त्या पातळीवरील सत्तेनें आम्ही बद्ध होतो. या कारणामुळेंच बहुशः अनपेक्षित व दुर्भाग्यपूर्ण, सामान्य जीवनौघाच्या विरोधी, व बाधापूर्ण, कांहीं वेळां तर अत्यंत दुःखद असे सारे परिणाम आम्हांस भोगावे लागतात; व नंतर ते ओलांडावे लागतात. म्हणून, हे प्रभो, दिव्य प्रेममय स्वामी, तुझी, केवळ तुझीच जाणीव आम्हाला रहावी. निर्णय घेत असतांना, एकाद्या गोष्टीची निवड करीत असतांना तुझ्याच सर्वोच्च कायद्याशीं, संकल्पाशीं आम्हीं एकरूप असावें. म्हणजे तुझाच संकल्प आमचा मार्गदर्शक होईल; आणि अशारीतीनें आमचें जीवन प्रत्यक्षतः आणि सर्वांगीणतया तुलाच समर्पित होऊन जावें अशी आमची इच्छा आहे.

तुझ्याच प्रकाशामध्यें आम्ही पाहूं, तुझ्याच ज्ञानज्योतीनें आम्ही ज्ञान करून घेऊं, तुझ्याच संकल्पामध्यें स्वसंकल्पाचा प्रत्यय घेऊं.

—श्रीमाताजी

CWMCE Vol 01 : Page 62

श्रीअरविंदांचा संदेश

१५ ऑगस्ट १९४७

१५ ऑगस्ट १९४७ हा स्वतंत्र भारताचा जन्मदिन आहे. एक प्राचीन युग संपून नवीन युगाचा प्रारंभ ह्या दिनानें सूचित होतो. परंतु हा दिवस केवळ आपल्या दृष्टीनेंच नव्हे तर आशिया खंड आणि अखिल जग यांच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचा आहे. कारण मानवजातीचें राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक भवितव्य निश्चित करण्याच्या कार्यात ज्या राष्ट्रसमूहास फार मोठा वांटा उचलावयाचा आहे, त्यामध्यें असंख्य संभाव्यतांनीं युक्त असलेल्या नवशक्तीचा संचार या दिवसानें सूचित केला जात आहे. जो दिवस, माझी जीवन-दृष्टि स्वीकारलेले माझे अनुयायी, माझा जन्मदिन म्हणून दरवर्षीं साजरा करीत होते, तो 'माझा जन्मदिन' म्हणून मला स्मरणीय होताच; पण त्याच दिवसाला इतकी विशाल सार्थता प्राप्त झाली ही गोष्ट व्यक्तिशः मला साहजिकच संतोषदायक असणार. पण हे दोन्हीं दिवस एकच येणें हा केवळ एक योगायोग किंवा एक आकस्मिक घटना आहे असें मी गूढानुभववादी या नात्यानें मानीत नाहीं; तर जीवनाच्या प्रारंभापासून मीं जें कार्य सुरू केलें त्याचा, मला पावलोपावलीं मार्गदर्शन करणाऱ्या भगवत्‌शक्तीनें स्वीकार करून त्यावर या योगें जणुं शिक्कामोर्तबच केलें आहे असें मी मानतो. जीं जीं जागतिक आंदोलनें सफल झालेलीं मीं माझ्या आयुष्यांत पहावीं अशी मी आशा बाळगली होती, पण जीं त्यावेळीं सत्यसृष्टींत येण्यास अशक्य असलेल्या स्वप्नासारखीं दिसत होती तीं, आज एकतर जवळ जवळ सफल होत असलेली किंवा सफलतेच्या मार्गास नुकतींच लागलीं असून प्राप्तव्याकडे प्रगत होत असलेलीं मी पहात आहे.

या महत्त्वाच्या प्रसंगीं मीं एकादा संदेश द्यावा असें मला सांगण्यांत आलें आहे. परंतु अशातऱ्हेचा संदेश देण्याजोगी माझी परिस्थिति जवळ जवळ नाहीं. तरीपण लहानपणीं आणि तारुण्यांत जीं उद्दिष्टें आणि ध्येयें मीं स्वीकारलीं व जीं आज सफल होण्यास सुरुवात झाली आहे, त्यांचा केवळ व्यक्तिशः जाहीरपणें पुनरुच्चार करणें, येवढें फक्त मी आज करूं शकेन; कारण भारताच्या स्वातंत्र्याशीं त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. भारताचें मी जें भावी कार्य समजतो आणि ज्या कार्यांत नेत्याचें स्थान स्वीकारल्याशिवाय भारताला गत्यंतर नाहीं, त्या कार्याचीं हीं ध्येयें व उद्दिष्टें म्हणजे अंगभूत भाग आहेत. तसेंच आजपर्यंत मी असें मानीत आलो आहे व सांगतहि आलो आहे कीं, भारत जागृत होत आहे, उन्नत होत आहे, तो स्वतः-च्याच भौतिक गरजा भागविण्यासाठीं नव्हे, स्वतःचाच विस्तार, मोठेपणा, सामर्थ्य आणि समृद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं नव्हे; अर्थात् यांच्याकडेहि त्यानें दुर्लक्ष करून चालणार नाहीं. तसेंच इतर राष्ट्रांप्रमाणें अन्य लोकांवर अधिकार गाजविण्यासाठीं तर भारताचें हें उत्थापन निश्चित नाहीं. **भगवंतासाठीं, जगासाठीं, अखिल मानवजातीचा साहाय्यक व नेता होण्यासाठींच केवळ भारत जागृत होत आहे.**

त्यांच्या स्वाभाविक क्रमाप्रमाणें माझ्या समोरील उद्दिष्टें व ध्येयें पुढील प्रमाणें होतीं.

१) भारतीय स्वातंत्र्य व भारतीय ऐक्य मिळवून देणारी **क्रांति**; २) भूतकालीं मानव-संस्कृतीच्या प्रगतीच्या कार्यांत स्वीकारलेली जबाबदारी पुनः स्वीकारण्यासाठीं **आशियाचें पुन-रुत्थापन** व बंधविमोचन; ३) नवजीवनाची सर्वांगीण सिद्धी बाह्यतः ज्या भिन्नभिन्न राष्ट्रां-च्या आंतरराष्ट्रीय एकीकरणावर अवलंबून आहे त्यामध्यें प्रत्येक राष्ट्राचें राष्ट्रीय जीवन अलग-पणें सुरक्षित व निर्धास्त राहील आणि सर्व राष्ट्रें सर्वोच्च आणि अंतिम एकतेमध्यें एकरूप राहतील असें **अखिल मानवजातीसाठीं एक विशालतर, उज्ज्वलतर आणि अधिक उदात्त जीवन विकास पावणें**; ४) स्वतः जवळचें आध्यात्मिक ज्ञान व जीवनाचें आध्यात्मीकरण करणारी सर्व साधनसामग्री **भारतानें अखिल मानववंशास देणगी म्हणून देणें** शेवटीं, ५) मानवानें प्रथमच विचार करण्यास व वैयक्तिक पूर्णत्वाची आणि सर्वांगपूर्ण समाजाचीं स्वप्नें रंगविण्यास सुरुवात केली तेव्हांपासून, अस्तित्वविषयक ज्या अनेक समस्यांनीं त्याला गोंधळांत टाकलें व विभ्रांत केलें त्या यशस्वीरीतीनें सोडविण्यास जेथून प्रारंभ करतां येईल अशा नवभूमिकेवर नेण्यासाठीं **मानवाची जाणीवेची पातळी उंचावून त्यानें क्रमविकासामध्यें पुढील पाऊल टाकणें.**

भारत स्वतंत्र झाला आहे, परंतु त्याला अजून एकत्व प्राप्त झालेलें नाहीं; केवळ मोडकें तोडकें, छिन्नभिन्न स्वातंत्र्य त्याला मिळालें आहे. एका काळीं जवळ जवळ असेंहि भासूं लागलें होतें कीं, ब्रिटिशांनीं भारत जिंकण्यापूर्वी ज्याप्रमाणें भारतांत विलग विलग राज्यें माजलीं होतीं त्या अवस्थेंत भारत पुनः जाऊन पडणार; परंतु सुदैवानें आतां अशी विपत्तिजनक अवस्था टाळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. घटना समितीच्या (Constituent Assembly) कौशल्यपूर्ण धोरणामुळें, कोणताहि विरोध अथवा मतभेद निर्माण न होतां, पददलित वर्गाचा प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परंतु पूर्वीचा हिंदु-मुसलमानांचा जातीय भेद इतका वाढला आहे कीं जणुं कांहीं ते राजकीय दृष्टया देशाचें दोन कायमचेच विभाग होऊन राहिलेले आहेत. तरी अशी आशा धरावयास पाहिजे कीं काँग्रेस किंवा देशांतील लोक हा विभजनाचा निर्णय, कायमचा निर्णय समजणार नाहींत. किंवा केवळ तात्पुरती सोय यापेक्षां अधिक महत्त्व त्याला देणार नाहींत. कारण हें विभजन जर अधिक काळ टिकलें तर भारत अतिशय दुर्बल होऊन जाईल; एवढेंच नव्हे तर पंगु होईल; नेहमींच आपआपसांतील कल-हाची शक्यता राहील. अर्थात् त्यामुळें परकीय आक्रमण होऊन परकीयांच्या ताब्यांत देश जाण्याचाहि संभव निर्माण होईल. देशाचें हें विभजन नाहींसें झालेंच पाहिजे;—विरोध कमी कमी होत जाऊन किंवा शांति आणि मैत्री यांच्या आवश्यकतेची जाणीव अधिकाधिक वाढत जाऊन किंवा दोघांनीं मिळून काम करण्याची वारंवार गरज उत्पन्न होऊन किंवा त्या-साठीं ऐक्य हें एक साधन आहे अशी जाणीव उत्पन्न होऊन हें विभजन नाहींसें होऊं शकेल अशी आशा आपण धरली पाहिजे. अशातऱ्हेनें कोणत्याहि स्वरूपांत एकत्व प्रस्थापित होवो. हें कोणत्या पद्धतीनें होणार, या गोष्टीला व्यावहारिक दृष्टया महत्त्व असलें तरी तात्त्विक दृष्टया त्याला विशेष महत्त्व नाहीं. परंतु कोणत्या कां उपायांनीं होईना, विभजन नष्ट झालेंच पाहिजे आणि तसें तें होणारच. कारण त्याविना भारताचें भवितव्य उज्ज्वल राह-णार नाहीं, निष्फलहि ठरेल. परंतु तसें होतां कामा नये.

आशिया जागृत झाला आहे. त्यांतील मोठमोठे भाग स्वतंत्र झाले आहेत किंवा यावेळीं

स्वतंत्र होऊं लागले आहेत. अजूनहि परतंत्र असलेले इतर भाग, कितीहि सघर्ष करावे लागले तरीहि ते करून स्वातंत्र्याच्या मार्गावर पुढें पुढें चालले आहेत. केवळ अगदीं थोडेंच कार्य आतां शिल्लक राहिले आहे; पण तेंहि आज ना उद्यां पूर्ण होईल. या क्षेत्रामध्यें भारताला कांहीं वांटा उचलावयाचा आहे; आणि तें कार्य भारतानें अशा कांहीं जोमानें आणि कर्तबगारीनें सुरू केलें आहे कीं त्यावरून त्याच्यामध्यें काय काय संभाव्यता आहेत आणि राष्ट्रमंडळामध्यें तो कोणतें स्थान घेऊं शकेल हें अगोदरच दिग्दर्शित केलें जात आहे.

मानवजातीच्या एकीकरणास प्रारंभ झाला आहे. मात्र त्याची मूळ प्रेरणा सर्वांगीण नाहीं. त्यांत सुसंघटितपणा असला तरी त्याला महान् अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. परंतु त्यांतहि एक प्रकारचा वेग आहे, हें मात्र निश्चित; आणि जर ऐतिहासिक अनुभव मार्गदर्शक म्हणून जमेस घेतला तर, हा वेग, त्याचें उद्दिष्ट साध्य होईपर्यंत वाढतच जाईल. या कार्यक्षेत्रांतहि भारतानें एक महत्त्वपूर्ण भूमिका घेण्यास प्रारंभ केला आहे; आणि यानंतर, भारतानें, जिला वर्तमान घटनांनीं किंवा तत्कालिक शक्याशक्यतांनीं मर्यादा अथवा बांध पडत नाहीं, तर जी भविष्यकाळांतील शक्यतांवर दृष्टि टाकून त्या अधिक जवळ आणूं शकते, अशी राजकारणपटुता संवर्धिली तर तिच्या अस्तित्वामुळें, मंद आणि भीत भीत केलेल्या प्रगतीऐवजीं अति वेगानें आणि निर्भयपणानें विकास सुरू होईल. असाहि संभव आहे कीं या क्षेत्रामध्यें एकदम कांहीं उत्पात किंवा आघात होऊन जें काय कार्य होत आहे तें थांबेल किंवा तें उध्वस्तहि होऊन जाईल; परंतु असें असूनहि अंतिम विजय मात्र निश्चित आहे. कारण, कांहींहि असलें तरी, प्रकृतीच्या मार्गांतील, हें मानवजातीचें एकीकरण म्हणजे एक अटळ घटना आहे; आणि म्हणून, तें सिद्ध होणारच, असें भविष्य निःसंदिग्धपणें सांगतां येणें शक्य आहे. निरनिराळ्या राष्ट्रांनाहि एकीकरणाची जरूरी आहे हेंहि स्पष्टच आहे. कारण त्याशिवाय लहान लहान देशांचें स्वातंत्र्य अतःपर सुरक्षित राहूं शकणार नाहीं आणि मोठमोठीं व शक्तिमान् राष्ट्रें सुद्धां अशा एकीकरणाशिवाय, खऱ्या अर्थानें सुरक्षित राहूं शकणार नाहींत. भारत जर खंडित राहिला तर सुरक्षिततेची त्यास खात्री देतां येणार नाहीं. म्हणून सर्वांच्याच कल्याणासाठीं अखंडत्व हें प्रस्थापित झालेंच पाहिजे. केवळ मानवाची असमर्थता व बुद्धिमांद्य आणि मूढ स्वार्थपरायणताच फक्त या एकत्वाच्या आड येणें शक्य आहे. मनुष्याच्या या दुर्गुणांविरुद्ध देवांनीं केलेले प्रयत्न सुद्धां व्यर्थ जातात, असें म्हणतात. परंतु प्रकृतीची निकड आणि ईश्वरी संकल्प यापुढें या गोष्टी टिकाव धरूं शकणार नाहींत. या सर्व गोष्टी घडल्यानंतरच, राष्ट्रधर्माचें उद्दिष्ट साध्य झालें असें होईल.

यापुढें आंतरराष्ट्रीय भावना आणि दृष्टिकोन, सर्वत्र वाढीस लागला पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्था निर्माण झाल्या पाहिजेत; किंवा याचें असेंहि स्वरूप होऊं शकेल कीं एकादा मनुष्य एकाच वेळीं दोन किंवा अनेक देशांचा नागरिक राहील; भिन्न भिन्न संस्कृती स्वेच्छेनें परस्परांत मिसळून जाऊन हा बदल दिसून येईल; राष्ट्रीयभावनेमधील युद्धप्रियता कमी होऊन, असा अनुभव येईल कीं निर्भेळ राष्ट्रीय भावनेमध्यें या सर्व गोष्टी, आपल्या दृष्टिकोनांतूनहि पूर्णपणें जुळत्या मिळत्याच आहेत. एकत्वाची एक नवी भावना मानवजातीच्या मनाचा कबजा घेईल.

भारताचें साऱ्या जगाला आध्यात्मिक दान केव्हांच सुरू झालें आहे. अधिकाधिक वाढत्या

गतीनें भारताची आध्यात्मिकता युरोप आणि अमेरिका खंडांत प्रवेश करीत आहे. त्याची गति दिवसानुदिवस एकसारखी वाढत जाईल; अनेक दुर्घटना घडत असतांहि भारताकडे अधिकाधिक लोकांचे डोळे आशेनें लागून राहिले आहेत; आणि भारताच्या केवळ शिकवणीचाच नव्हे, तर त्याच्या आंतरात्मिक आणि आध्यात्मिक प्रत्यक्ष साधनमार्गाचाहि आश्रय वाढत्या प्रमाणांत घेतला जाऊं लागला आहे.

याखेरीज इतर गोष्टी (मानवानें विकासामध्यें पुढची पायरी गांठणें इ०) म्हणजे माझ्या व्यक्तिगत आशा, भावना किंवा आदर्श आहेत असें म्हणतां येईल. परंतु भारतामध्यें किंवा पाश्चात्य देशांत जे कोणी भविष्यांत दृष्टि टाकण्यास समर्थ आहेत, त्यांच्या मनाचा कबजा हळुंहळुं या गोष्टी घेऊं लागल्या आहेत. मानवी प्रयत्नांच्या इतर क्षेत्रांपेक्षां या क्षेत्रांतील अडचणी अधिक भयंकर आहेत; परंतु अडचणी या ओलांडण्यासाठींच असतात; आणि कार्यापाठीमागें सर्वेश्वराचा संकल्प असेल तर अडचणी या ओलांडल्या जाणारच. या क्षेत्रामध्यें सुद्धां आध्यात्मिक उत्क्रांति व्हावयाची असेल––(कारण आत्मविकास व आंतरिक जाणीवेचा विकास यांच्याद्वारांच ती साध्य होते.)––तर त्या आध्यात्मिक उत्क्रांतीची आद्य प्रेरणाहि भारताकडूनच येऊं शकेल, आणि ही घटना जरी विश्वव्यापी होणार असली तरी त्याचें केंद्रस्थान भारतच राहील.

भारताच्या या मुक्तता-दिनामध्यें माझ्या या भावना व आदर्श मी पहात आहे, रुजवीत आहे. ह्या सर्व फलद्रूप होतील कीं नाहीं, किती प्रमाणांत व किती लवकर त्या फलित होतील हें सर्व या नवीन व स्वतंत्र भारतावरच अवलंबून आहे. ––श्रीअरविन्द

CWSA - Autobiographical Notes - The Fifteenth of August 1947

श्रीमाताजींचीं प्रवचनें

१

योग्य वृत्तीचें सामर्थ्य

खरोखरीच, उत्कृष्ट तेंच नेहमीं घडत असतें काय?

जें कांहीं घडून गेलेलें आहे तें तसें घडणें अटळ होतें म्हणूनच घडलें हें स्पष्ट आहे. त्याशिवाय दुसरें कांहीं घडणें अशक्यच होतें––विश्वव्यापी नियतीच्या नियमानुसार तें तसें घडणारच होतें. परंतु एकादी गोष्ट घडून गेली म्हणजेच आपण असें म्हणूं शकतो. आधीं आपण कांहींच बोलूं शकत नाहीं कारण उत्कृष्ट, कल्याणकर असेंच घडणें शक्य आहे कीं नाहीं हा प्रश्न, तसें पाहतां केवळ वैयक्तिक आहे. मग ती व्यक्ति म्हणजे एकादें राष्ट्र असो वा एकादी मानव व्यक्ति असो. तरीपण हें सर्व केवळ त्या त्या व्यक्तीनें स्वीकारलेल्या भूमिकेवर अवलंबून असतें. कांहीं एक विशिष्ट घटना घडण्याच्या बेतांत आहे, अशा परिस्थितिमध्यें जर तुम्हीं शक्य तितकी उच्चतम भूमिका घेऊं शकलांत म्हणजेच तुम्हाला शक्य

तितक्या अधिकांत अधिक उच्च जाणीवेशीं तुमची व्यक्तिगत जाणीव संयुक्त ठेवूं शकलांत तर त्यावेळीं जें घडेल तें तुमच्या हिताच्या दृष्टीनें अत्युत्कृष्टच घडेल याबद्दल पूर्ण खात्री देतां येईल. पण त्या जाणीवेमधून तुम्ही खालच्या पातळीवर येतांक्षणींच, तुमची सर्वोच्च भूमिका सुटल्यामुळेंच, त्यावेळीं जें जें घडेल तें तें उत्कृष्टच असेल असें मुळींच सांगतां येणार नाहीं---याहीपुढें जाऊन मी निश्चयात्मक असें म्हणूं शकेन कीं, व्यक्तीच्या अगदीं नजीकच्या परिस्थितीचा विचार करतां, योग्य वृत्ति ठेवली असतां, योग्य भूमिका राखली असतां, कोण-तीहि परिस्थिति व्यक्तीला नुसती अनुकूल होते एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष परिस्थिति अथवा प्रत्यक्ष घटनाहि सर्वस्वीं बदलवून टाकण्याचें सामर्थ्य या योग्य वृत्तीमध्यें असतें. उदाहरणार्थ, एकादा मनुष्य तुम्हाला ठार मारण्यासाठीं आला आणि तेव्हां जर जाणीवेच्या नेहमींच्याच पातळीवर, सामान्य भूमिकेवरच तुम्ही असलांत आणि भ्यालात तर, ज्या उद्देशानें तो मनुष्य आला असेल तो बहुशः सफल झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण तुम्ही थोडेसे उच्च भूमिकेवर चढलां आणि पूर्ण भयग्रस्त असतांहि जर मदतीसाठीं देवाचा धांवा केलात तर त्याचा प्रयत्न थोडक्यांत हुकेल. फार तर थोडीशी जखम होईल. समजा, तुम्ही योग्य, उच्चतम भूमिकेवर असलांत व तुमच्याभोंवतीं सर्वत्र उपस्थित असलेल्या परमेश्वराच्या सान्नि-ध्याची सतत जाणीव तुम्हाला असली तर मात्र तुमच्याविरुद्ध बोटहि वर उचलण्याची त्या माणसाची प्राज्ञा होणार नाहीं.

स्वभाव-परिवर्तनाची समस्या सोडविण्याची एक गुरुकिल्ली म्हणजे हें वर सांगितलेलें सत्यसूत्र होय. **ईश्वरी सान्निध्याची निरंतर जाणीव राखा, तिचें अनुसंधान ठेवा, ती जाणीव तुमच्या ठिकाणीं खालीं उतरविण्याचा प्रयत्न करा---म्हणजे नेहमीं उत्कृष्ट, मंगलमय असेंच तुमच्या बाबतींत घडेल.** अर्थात् सर्व जग एकाएकी बदलून जाईल असें नाहीं; तर शक्य तितक्या जलद गतीनें त्याची प्रगति होईल. मात्र हें विसरूं नका कीं, तुम्ही जर सरळपणें योगमार्गावरूनच चाललां असाल तरच हें सर्व घडेल. योगमार्गापासून विचलित होऊन जर तुम्ही अन्य मार्गास लागलांत, असाहयपणें आणि कुठल्यातरी जंगलांतील आडमार्गानें भट-कल्यासारखें, स्वच्छंदीपणानें जाऊं लागाल तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

तुमच्यापैकीं प्रत्येक जणानें जर अटोकाट प्रयत्न केला तर योग्य सहकार्यानें काम होईल आणि त्याचें फलहि तितचेंच शीघ्रगतीनें मिळेल. योग्य भूमिकेचा प्रभाव कसा असतो याची अगणित उदाहरणें मला माहीत आहेत. केवळ एकादा मनुष्य जरी अत्युच्च भूमिका राखूं शकला तर त्यामुळें असंख्य माणसें प्राणघातक संकटांतून कशी वांचलीं आहेत हें मी पाहिलें आहे. पण ही भूमिका राखावयाची म्हणजे शरीरास नेहमींच्या क्रिया प्रतिक्रियांच्या आंदोलनांत ठेवून आपण मनानें कोठेंतरी दूर, उंच भूमिकेवर चढन तेथें रहावयाचें असें मात्र नाहीं. अशा तऱ्हेनें तुम्ही उच्च भूमिकेवर जाऊन बसलांत आणि "देवाच्या इच्छेनें काय व्हायचें तें होऊं दे" असें म्हणूं लागलांत तर वरील उदाहरणांत सांगितल्याप्रमाणें कदाचित् तुमचा घात-हि होईल. कारण अशावेळीं तुमचें शरीर अदिव्यच राहिलेलें असेल व भीतीनें त्याचा थर-कांप होत असेल, असो. मुख्य गोष्ट म्हणजे खरी, योग्य, उच्च अशी भूमिका प्रत्यक्ष शरी-रांत धारण करणें. भीतीचा लवलेशहि न बाळगतां दिव्य शांति स्वतःच्या ठिकाणीं ओतप्रोत भरून घेणें. असें करतां आलें तर मात्र तुम्हांला धोका नाहीं. त्यावेळीं कोणा मानवांचेच

हल्ले केवळ परतविले जातील असें नाहीं तर हिंस्र पशु आणि पंचमहाभूतें यांच्यावरहि तुमचा प्रभाव पडेल. ?

याचें एक लहानसें उदाहरण मी देऊं शकेन. मागें एका रात्रीं भयंकर वादळ झालें होतें, केवढी गर्जना चालली होती, पावसाचा सर्व बाजूंनीं सपाटून एकसारखा मारा चालला होता, ती रात्र तुम्हांला आठवत असेल. त्यावेळीं मला वाटलें श्रीअरविंदांच्या खोलीमध्यें आपण जावें व खोलीच्या खिडक्या लावून घेण्यास त्यांना मदत करावी. असा विचार करून त्यांच्या खोलीचें मीं नुसतें दार उघडलें व आंत पाहिलें, तर अगदीं शांतपणें नेहमींसारखे ते टेबलावर लिहीत बसलें होते. खोलींत इतकी कांहीं भरीव शांति होती कीं, बाहेर एकादें भयंकर वादळ उठलें असेल असें कोणाच्या स्वप्नींहि येणार नाहीं. सर्व खिडक्या अगदीं सताड उघड्या होत्या आणि तरीहि पावसाचा एक सुद्धां थेंब खोलींत येत नव्हता !

CWMCE Vol 03 : Page 154

२

असत्यावर विजय

आज बिचाऱ्या मानवजातीवर असत्यरूपी देवतांचें जवळ जवळ संपूर्ण आधिपत्य आहे. हीन पातळीवरील प्राणशक्ति वा हीन वासनामय अस्तित्व यांनींच केवळ त्या असत्याचा अंगीकार केलेला आहे असें नव्हे तर मानवाच्या संपूर्ण मनानें त्याचा स्वीकार केलेला आहे. असत्य देवांची पूजा अगणित रीतींनीं केली जात आहे कारण त्या देवतांच्या युक्त्या प्रयुक्त्या अगदीं गुप्त, नकळत आपले हेतु साध्य करून देणाऱ्या व बाह्यरूपांनीं मानवास भुरळ पाडणाऱ्या अशा आहेत. याचा परिणाम असा झाला आहे कीं जीवनांतील इतर अतीव सुन्दर गोष्टींपेक्षांहि आपल्या ठिकाणच्या असत्यास, जणुं मौल्यवान् ठेवाच समजून, मानव अधिक कवटाळून बसला आहे. असत्य आपणांपासून कोणी हिरावून घेईल कीं काय, या धास्तीनें तो त्यास आपणां स्वतःमध्यें खोल खोल दडवून ठेवून त्याचें रक्षण करण्याची दक्षता बाळगत आहे. परंतु आंत दडविलेलें हें असत्य बाहेर काढून तें भगवंताच्या चरणीं अर्पण केल्याशिवाय मानवास खरें सौख्य कधींच लाभणार नाहीं.

खरोखरीच, असत्यास आंतून बाहेर काढून दिव्य प्रकाशांत आणून ठेवणें हें एक तऱ्हेनें मानवाचें फारच मोठें परिवर्तन म्हणतां येईल, अंतिम विजयाची तो वाट चालूं लागला असें म्हणतां येईल. कारण आपणांतील असत्याचा एक एक अंश बाहेर काढून प्रकाशांत आणणें हाच मुळीं एकेक विजय आहे : एकादा प्रमाद कबूल करणें, म्हणजे एकेका असत्यरूप, तमोरूप देवतेस नष्ट करणें आहे. ही कबुली स्वतःशींच केलेली असली तरी चालेल; फक्त ती प्रामाणिक हवी. दुसऱ्याच क्षणाला चुकीचा विसर पाडणाऱ्या तात्पुरत्या पश्चात्तापाच्या, वैराग्याच्या स्वरुपाची ती नसावी. शिवाय तसा प्रमाद, तशी चूक पुनः न व्हावी म्हणून जी अभंग प्रतिज्ञा करावी लागते तिला आवश्यक असणाऱ्या संकल्पशक्तीच्या सामर्थ्याचा अभावहि तेथें असतां कामां नये. ही कबुली भगवत्स्वरूप गुरुसमोरहि देतां येईल. अशा तऱ्हेनें तुम्ही स्वतः प्रत्यक्ष गुरुजवळ प्रमादाची कबुली दिल्यावर तुम्ही जो निश्चय करतां तो 'तुमचा' रहात

नाहीं कारण तुम्ही प्रामाणिक असाल, अंतःकरणपूर्वक प्रयत्न करीत असाल, तर तुमचा निश्चय पार पाडण्यासाठीं आधींच भगवंताची आज्ञा सुटलेली असते.

मी हें काय म्हणत आहे याचा बरोबर अर्थ समजण्यासाठीं मी माझा स्वतःचा अनुभव सांगते. श्रीअरविंदांना पाँडीचेरीस जेव्हां मी प्रथमच भेटलें त्यावेळचा हा अनुभव आहे. त्यावेळीं मी एकाग्र व खोल ध्यानावस्थेंत होते. ज्या गोष्टी पुढें घडणार होत्या, पण कोणत्या तरी कारणानें ज्या प्रकट होऊं शकत नव्हत्या, अशा अतिमानस भूमिकेवरील गोष्टी मी त्यावेळीं पहात होते. नंतर, मी जें पाहिलें तें मीं श्रीअरविंदांना सांगितलें आणि 'खरोखरीच त्या गोष्टी पुढें घडतील का ?" असें विचारलें. त्यांनीं नुसतें म्हटलें, "**होय**". आणि क्षणार्धांत अतिमानस शक्तीनें खरो-खरीच पृथ्वीस स्पर्श केला व तिचा आविष्कार होण्यास प्रारंभ झाला असें मीं पाहिलें. कोणतेंहि सत्य प्रत्यक्षांत उतरविण्याचें अतर्क्य सामर्थ्य त्याचवेळीं प्रथम मी प्रत्यक्ष पाहिलें. हें ज्या सामर्थ्यानें घडविलें तेंच सामर्थ्य तुमच्या ठिकाणींहि त्या सत्याचा आविष्कार घडवील. जर तुम्ही याल आणि खरोखरी अंतःकरणापासून म्हणाल,––"ह्या असत्यापासून मला माझी सुटका करून घ्यावयाची आहे"––तर असें म्हणतांच तुम्हांला एकच एक उत्तर ताबडतोब मिळेल, "**होय**".

––श्रीमाताजी, मातृवाणी भाग ३ मधून

CWMCE Vol 03 : Page 141

३

खरी विश्रांति

"ध्येय मार्गावरील पायरीलाच शिखर मानणें अथवा विश्रामस्थळीं अधिक काळ रेंगाळत रहाणें यापेक्षां तुम्हांला विमूढ करणारी दुसरी कोणतीच चूक नाहीं."––

मानवी स्वभावांत जें कांहीं निर्जीव, जड, आळशी, अल्पसंतुष्ट, यत्नविरोधी असेल त्याविषयीं आपण सावध रहावें म्हणून हा विचार श्रीअरविंदांनी लिहिला आहे. संघर्षाची भीति वाटते म्हणून शांतीचे भोक्ते बनलेल्या व्यक्ती कितीतरी वेळां आपण जीवनांत पहातो. स्वास्थ्य प्राप्त करून घेण्यापूर्वींच विश्रांतीसाठीं झुरणारीं माणसें आपण पहातो. थोड्याशा प्रगतीवरहि संतुष्ट रहाणारे लोक आपणांस भेटतात. त्यानंतर तेथेंच विसांवा घेतां यावा म्हणून आपल्या कल्पनेनें ते त्या अल्पस्वल्प उन्नतीलाच मोठा साक्षात्कार समजतात.

सामान्य जीवनांत तर असा अनुभव अधिकच येतो. त्याची सुरुवात वास्तविक पहातां समाजाच्या सुखवस्तु, गर्भश्रीमान् वर्गामध्येंच झालेली दिसते. या सुखवस्तु ध्येयाचा त्यांनीं जो मानवतेसमोर आदर्श ठेवला त्यामुळेंच आजच्या मानवाला ही हीन स्थिति आलेली आहे.

"तरुणवय आहे तोपर्यंत काम करा. पैसा व मान-सन्मान मिळवा, दूरदर्शीपणानें कांहीं कमाई बाजूला ठेवा, बरेचसें भांडवल सांठवा. एकाद्या हुद्याची जागा मिळवा म्हणजे साधा-रण चाळीशीच्या सुमारास तुम्हांस स्वस्थपणें बसतां येईल; असलेल्या संपत्तीचा उपभोग घेतां येईल, पुढें मग पेन्शन आहेच." म्हणजेच निढळ्या घामानें मिळविलेल्या विश्रांतिसुखाचा आस्वाद तुम्ही घ्या, असें म्हटलें जातें. मार्गांत खालीं बसणें, वाटेंत थांबणें, पुढें पाऊल न

टाकणें, झोंपा घेणें, उतरणीस लागणें व अकालीच परलोकाच्या वाटेस लागणें व शेवटीं या जगांतून अंतर्धान पावणें हेंच जीवनाचें एक उद्दिष्ट सांगितलें जातें !

खालीं बसायचें, पुढें पाऊलहि टाकायचें नाहीं !

ज्या क्षणीं पुढें पुढें नेणारा प्रवास तुम्ही थांबवतां, त्याक्षणीं तुमचा अधःपात सुरुं होतो. ज्या क्षणीं तुम्ही, आहे त्यांत संतोष मानतां व अधिक कांहीं मिळविण्याची आकांक्षा सोडून देतां, त्या क्षणापासून तुमचा मृत्यू सुरुं होतो. जीवन ही गति आहे, धडपड आहे. जीवन म्हणजे सतत पुढें पुढें कूच करीत रहाणें, जणुं गिर्यारोहण करणें. भावी अनुभव व साक्षात्कार यांकरतां सतत उंच उंच चढत जाणें म्हणजे जीवन. विश्रांतीची गरज भासणें, इच्छा धरणें यापेक्षां दुसरी भयंकर गोष्ट नाहीं. कर्मामध्यें, प्रयत्नामध्यें, पुढें पुढें कूच करण्यांतच तुम्हांला विश्रांति लाभली पाहिजे. **भगवंताच्या कृपेवर संपूर्ण भार टाकल्यामुळें जिवाला जी विश्रांति व स्वस्थता लाभते, वासनाराहित्यामुळें व अहंकाराच्या लयामुळें जी विश्रांति मिळते तीच खरी विश्रांति होय.**

सतत विशाल होण्यांत, विश्वाला व्यापणारी चेतना प्राप्त करून घेण्यांत खरें स्वास्थ्य, खरी विश्रांति आहे. अखिल जगाइतकें व्यापक, विस्तृत व्हा म्हणजे नेहमींच विश्रांत स्थितींत तुम्ही विराजमान व्हाल. कर्मबाहुल्यांत, युद्धाच्या धुमश्चक्रींत, यत्नसातत्यांतच तुम्हांला अनंताची व शाश्वत भावाची शांति व विश्रांति प्राप्त होईल.

CWMCE Vol 09 : Page 64

४

उपवास

शरीर हें प्राणशक्तीचें केंद्र असतें. जेव्हां शरीर सुस्थितींत असतें तेव्हां अन्नद्वारां तें प्राणशक्ति व सामर्थ्य मिळवितें. प्राणशक्ति आपणामध्यें शोषून घेण्याची ही एक रीत झाली; जवळ जवळ येवढा एकच मार्ग आपणाजवळ असतो. सध्यांची जीवनाची जी पातळी व अवस्था आहे तिचा विचार करतां हाच एक प्रमुख मार्ग आपणांस उपलब्ध आहे. परंतु हा मार्ग आहे तामसिक.

ही जी शक्ति आपण अन्नद्वारां घेतो तिच्यासंबंधीं शांतपणें विचार केला तर कोणासहि पटेल कीं, ही शक्ति म्हणजे, वनस्पति किंवा प्राणी यांचीच प्राणशक्ति आपण अन्नद्वारां शरीरामध्यें शोषून घेत असतो. यावरून ही गोष्ट सहजच स्पष्ट होते कीं, ही जी प्राणशक्ति आपण अन्नद्वारां मिळवितो ती माणसाच्या स्वतःच्या प्राणशक्तीपेक्षां केव्हांहि हलक्या प्रतीचीच असणार. कारण प्राण्यांच्या चढत्या कोटि-क्रमामध्यें मानव हा सर्वांत उच्च पायरीवरील प्राणी मानला जातो. अन्नाबरोबरच तमोगुणाचा, जाणीवशून्यतेचा बराच मोठा भाग आपण आपल्या शरीरांत घेत असतो; तें टाळणें अशक्य असतें. अर्थात् त्यामुळें स्थूलता व जडता येणें स्वाभाविकच आहे. अधिक अन्न खाण्याची संवय असेल तर त्याच्या पचन-शोषण कार्यामध्यें आपल्या चेतनेचा बराचसा भाग गुंतून राहतो. समजा, आपण अन्नच घेतलें नाहीं तर त्या-

वेळीं, पचनाचें अथवा अन्नरसाच्या रूपांतराचें काम नसल्यामुळें आपणामधील जाणीवशून्यता कमी होईल व पचन-शोषण कार्यांत खर्ची पडणारी शक्ति सांठून राहील. खर्च झालेल्या शक्तीची भरपाई करण्याची मनुष्याच्या ठिकाणीं उपजतच क्षमता असते. आतां समजा, ही भरपाई अन्नद्वारां, म्हणजेच जाणीवेच्या खालच्या पातळीवरील वस्तुद्वारां, घ्यावयाची नाहीं असें आपण ठरविलें तर साहजिकच आपल्या भोंवतालीं पसरलेल्या असीम वैश्विक प्राणशक्तींतून ही घेण्याचा आपणाकडून प्रयत्न होईल, आणि जर ती वातावरणांतील मुक्त प्राणशक्ति आपण शोषून घेऊं शकलों, कोणत्याहि इतर साधनाशिवाय ग्रहण करूं शकलों, तर मग आपल्या शक्तीला मर्यादाच रहाणार नाहीं.

आपल्या पोटाप्रमाणें या शक्तीचें कार्य मर्यादित नाहीं. आपल्या पोटांत ठराविक परिमाणाचेंच अन्न पचूं शकतें व तें अन्नहि आपणांतील फारच थोडा शक्तीचा भाग माणसास पुरवितें. कारण चवर्ण करण्यामध्यें, पचनक्रियेमध्यें त्यांतील शक्ति खर्च झाल्यानंतर आपल्याला देण्यासाठीं कितीशी शक्ति त्या अन्नांत उरलेली असते? पण उलट जर, साहजिकपणें विश्वांत भरलेली प्राणशक्ति घेण्यास आपण शिकलों—कारण ही एक प्रकारें सहजप्रवृत्तीच असते—तर ती प्राणशक्ति आपण पाहिजे तेवढी, आपापल्या शक्तीप्रमाणें, आपणांमध्यें घेऊं शकूं; अशाप्रकारें खालच्या पातळीवरून प्राणशक्ति घेण्याचें आपण बंद केलें तर साहजिकच, सहजप्रवृत्तीस अनुसरून वातावरणांतील प्राणशक्ति घेण्याकरितां योग्य ती हालचाल व प्रयत्न आपणाकडून होतीलच. कधीं कधीं ही प्राणशक्ति प्रमाणापेक्षां अधिकहि आपणांत घुसते व त्यामुळें अधिक ताण वाटतो किंवा कधीं कार्याकरितां अधिक प्रेरणा, अधिक उत्साह वाटूं लागतो. आपलें शरीर जर बलवान् असेल आणि कांहीं काळ अन्नावांचून आपणांस निभत असेल तर मग ही शक्ति आपण सहजपणें पेलूं शकतो व तिचा वेगवेगळ्या मार्गांनीं उपयोगहि करूं शकतो. आंतरिक प्रगति करण्यास, अधिक सचेतन बनण्यास, स्वभावाचें परिवर्तन करण्यास, अशा कितीतरी गोष्टी करण्यास, या शक्तीचा आपणांस उपयोग होऊं शकेल. पण आपल्या शरीरांत फारशी राखीव शक्ति शिल्लक नसेल तर उपवासामुळें सहाजिकच शरीर दुबळें बनतें. आपण जी वैश्विक प्राणशक्ति घेतो तिची तीव्रता व आपल्या शरीराची धारण-क्षमता यामध्यें विसंवादिता निर्माण होऊन प्रकृतिस्वास्थ्य बिघडतें, मनःस्वास्थ्यहि बिघडतें. शरीरांत वाढलेल्या शक्तीच्या कार्यांतील तोल जातो आणि अशास्थितींत कोणताहि अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. असा तोल जातांच आत्म-संयमहि पुष्कळसा कमी होतो. आपण एकप्रकारें धुंद, सुन्न बनतो. ह्या अस्वाभाविक भावनाविवश धुंदीला कांहीं विशेष उच्चतर अवस्था आपण मानतो. पण हा केवळ आंतरिक असमतोल असतो, दुसरें कांहीं नाहीं. तसें नसेल तर मग त्यास्थितींत मनुष्य धुंद, सुन्न कसा होईल? इंद्रियें तरतरीत व कार्यक्षम राहतील. उपवासद्वारां खालच्या पातळीवरून प्राणशक्ति घेण्याचें थांबवल्यावर, समजा एकाद्या फुलाचा वास घेतला, तर तेवढयानेंहि हुशारी वाटेल, तो पोषक वाटेल; जो सुगंध आंत गेला असेल तोच अन्नाचें काम करील, आपणांस शक्ति देईल पण अशारीतीनें प्रत्यक्ष उपवास केल्यावांचून याचा अनुभव येणार नाहीं.

अशा धुंदींत असतांना कांहीं आंतरिक शक्ती थोडयाशा तीव्र होतात, अधिक जागृत होतात आणि आपण समजतों कीं हा कांहींतरी आध्यात्मिक लाभ होत आहे. परंतु वास्त-

विक पाहतां याचा आध्यात्मिकतेशीं फारच थोडा संबंध पोहोंचतो. अर्थात् सारखा अन्नाचाच विचार करीत बसण्यापेक्षां, तें मिळवायचें कसें, खायचें कसें या विवंचनेपासून मुक्त होण्याच्या उद्देशानें उपवास केला आणि परिणामतः जाणीवेची पातळी अंशतः उंचावली तरी त्याचा उपयोग होईल. **आपल्याठिकाणीं जर श्रद्धा व शक्ति असेल तर उपवासानें फायदा होईल.** आपली शुद्धि होईल. थोडीशी आध्यात्मिक प्रगतीहि होईल. या दृष्टीनें पाहिलें तर उपवास करणें ठीक आहे. त्यामुळें फक्त शरीर थोडेसें सडपातळ होईल, वाळेल; पण विशेष अपाय असा होणार नाहीं. पण जर उपवास करीत असतांना मनांत अन्नाचाच विचार घोंटाळत असेल, उपवास केला नसतां तर आपण काय काय खाल्लें असतें, उपवास संपल्यावर काय काय खायचें, याचाच मन विचार करीत राहिलें तर अतिभोजन करण्यापेक्षांहि असला उपवास अधिक वाईट.

मॅटर्लिंक (Materlinck) हा साहित्यिक, खरा कलाकार होता. सौंदर्यदृष्टि त्याला होती; त्यामुळें स्वतःचा स्थूलपणा त्याला आवडत नसे. शरीरांतील चरबी कमी व्हावी म्हणून त्यानें आठवड्यांतून एकदां उपवास करण्यास प्रारंभ केला. तो चांगला सुजाण होता. त्यामुळें त्या दिवशीं अन्नाचा विचार मनांत डोकावूं नये म्हणून तो सर्व वेळ, लेखनांत व अभ्या-सांत स्वतःस गुंतवून ठेवी. उपवास त्याला चांगलाच उपयुक्त ठरला.

एकंदर सारांश काय, तर तुम्ही अन्नाचा फार विचार करूं नका. आपल्या जीवनाची तुम्ही अशी कांहीं सुव्यवस्थित आंखणी करा, कीं ज्यामुळें अन्नाचा एकसारखा विचार करण्याचा प्रसंग तुम्हांवर येणार नाहीं. ठरलेल्या वेळीं हितकर, मित अन्न सेवन करा. त्यावेळीं शांत मन ठेवा. घाईघाईनें खाऊं नका. एकाग्र मनानें जेवा. अतिभोजन करूं नका. कारण तसें केलेंत तर त्याच्या पचनाची काळजी तुम्हांला घेत बसावें लागेल, तुम्हाला त्रास होईल व त्यांत तुमचा वेळ खर्च होईल. **देहाला आवश्यक असेल तेवढेंच नेमकें अन्न घ्या. अन्ना-विषयीं वासना, आकर्षण अथवा आवडीनिवडी ठेवूं नका.** देहाला जरूरी आहे म्हणूनच केवळ जेव्हां तुम्ही अन्नसेवन करीत असाल तेव्हां अन्न केव्हां पुरेसें झालें तें तुमचा देह अगदीं निश्चित स्वरूपांत, अचूकपणें तुम्हाला सांगेल. तुमच्या मनांत जेव्हां अन्नाविषयीं कांहीं पूर्व-नियोजित कल्पना दृढ झालेल्या असतात किंवा वासना असतात, एकाद्या पदार्थाविषयीं विशेष आवड असते तेव्हां तुम्ही जरूरीपेक्षां अधिक खाऊन शरीरावर एकप्रकारें सक्ती करतां व त्याच्या ठिकाणची ही, बरोबर किती अन्नाची जरूरी आहे हें सांगण्याची, नैसर्गिक शक्ति घालवून टाकतां.

—श्रीमाताजींच्या प्रवचनाधारें

योग-समन्वय

प्रास्ताविक

१

जीवन व योग

मानवी प्रयत्नांनीं केलेल्या बहुतेक सर्व महान् कार्यांत निसर्गाच्या दोन अनिवार्य शक्ती नेहमीं हस्तक्षेप करतांना आढळतात; मग ते प्रयत्न सामान्य कार्यक्षेत्राच्या कक्षेंतील असोत वा ज्यांना आपण उच्च वा ईश्वरी म्हणतो अशा असामान्य प्रांतात लोक-विलक्षण झेंप घेणारे असोत. प्रत्येक प्रयत्नाची गति सुरुवातीला एक विशाल व विविधतापूर्ण असा रसाळ मिलाफ साधण्याकडे असते व त्यांतूनच पुढें विशेष प्रयत्न व प्रवृत्ति पोसणारे अनेक ओघ निघतात; तदनंतर हे सर्व ओघ पुनः एका विशाल संगमाकडे धांव घेऊन एक महाचैतन्यशाली सर्वांगीण समन्वय साधतात. दुसरी गोष्ट म्हणजे, एकादा पार्थिव आकार धारण करणें हें कोणत्याहि आविष्काराच्या सिद्धतेचें आवश्यक अंग आहे; परंतु सत्य व प्रयत्न ह्यांच्या कोणत्याहि रूपरेषेला रूढ सांच्याचें स्वरूप आलें कीं जुनेपणानें त्यांतील ग्राह्यांश झांकाळला जातो. नवनवोन्मेषशालिनी चैतन्यानें प्रेरित होऊन अशा थकणाऱ्या गाडयाला पुनःपुनः संजीवन देणें वा त्यामध्यें परिवर्तन घडवून आणणें हें नवजीवनाच्या निर्मितीस आवश्यक आहे. भौतिक अमरत्वासाठीं, सतत पुनर्जन्म घेत रहाणें ही आवश्यक गोष्ट आहे. नवनिर्मितीपूर्वींच्या प्रसववेदनेनें पीडित झालेल्या अशा एका कालखंडांत आपण वावरत आहोंत, कीं ह्यावेळीं ज्या ज्या विचारप्रणालींत व कार्यांत उपयुक्ततेचा बळकट धागा असेल वा कालौघांत टिकवून धरणारा सुप्त गुण असेल त्या सर्वांना एक महान् कसोटी देऊन पुनर्जन्म घेण्याची संधि उपलब्ध झाली आहे. सध्यांच्या जगाचें स्वरूप 'मेडियाच्या अवाढव्य मुशी'–सारखे असून त्यांत सर्व गोष्टी ओतल्या जात आहेत, त्यांचे तुकडे तुकडे होत आहेत, त्यांवर प्रयोग होत आहेत व घुसळत घुसळत आणि पुनःपुनः सांधत असतां एक तर त्यांचें स्वतंत्रत्व नष्ट होऊन त्यांच्या अस्ताव्यस्त विखुरलेल्या कणांमधून नवरचनेचें साहित्य मिळत आहे किंवा त्याच गोष्टी आपल्या चैतन्यशीलतेनें पुनः उसळी घेऊन व रूपांतरित होऊन एक अभिनव पुनर्जीवन जगण्यास सिद्ध होत आहेत. निसर्गाच्या कांहीं महान् शक्तींचें विशेष कार्य किंवा त्यांची विशिष्ट रचना हें भारतीय योगाचें मूलस्वरूप आहे. त्या योग दर्शनाच्या अनेक शाखा, उपशाखा असून त्याची प्राविण्यपूर्ण विशेष मांडणी झाली आहे. हा योग, मानवजातीच्या भावी आयुष्यक्रमांत क्रांति घडविण्याचें सुप्त सामर्थ्य असणाऱ्या शक्तीं-

पैकीं एक आहे. प्रागैतिहासिक काळाचें हें बालक आपल्या सत्-चिन्मयी शक्तीनें आजहि उत्तम अवस्थेंत असून, आपलीं गुह्य द्वारें उघडून व संन्यस्त जीवनाच्या गुहांमधून बाहेर पडून मानवाच्या भविष्यकालीन जीवनासाठीं आपलें समर्थ व उपयुक्त असें चिरंजीव स्थान घेऊं पहात आहे. परंतु प्रथमतः त्यास आपलेंच रूप नीट न्याहाळून, निसर्गाचें महान् सत्य व चिरवांछित ध्येय यांचें प्रतिनिधित्व करणारें आपलें स्थान प्रकाशांत आणून, ह्या नवीन आत्मज्ञानानें व आत्मदर्शनानें आपलें विशाल समन्वयशील शुद्ध रूप धारण केलें पाहिजे. स्वतःची पुनर्रचना करूनच नवसंघटित वंशजीवनामध्यें त्याचा सुलभ व परिणामकारक प्रवेश होईल व तें मानवजातीस स्वतःच्या हृदयप्रवेशाच्या अत्यंत गुह्यतम भागांत व व्यक्तिमत्वाच्या मेरुशिखरीं स्वाभाविक नेतृत्वानें आरूढ करील.

जीवन व योग यांचें सम्यक् दर्शन असें स्पष्ट दर्शवितें कीं **अखिल जीवन हाच जाणीवपूर्वक किंवा अजाणतां चालणारा योग आहे.** कारण व्यक्तिमात्रामधील सुप्त शक्ती जागृत करून, सर्व चराचर सृष्टीमध्यें व मानवामध्यें अंशतः दृग्गोचर होणाऱ्या विश्वव्यापक व विश्वातीत सत् तत्त्वाशीं व्यक्तीचा संयोग घडविणें व पद्धतशीर प्रयत्नानें तिचा आत्मविकास पूर्ण करणें हाच मुळीं 'योग' या संज्ञेचा अर्थ आहे. बाह्य स्वरूपाचा भेद करून जीवनाच्या अंतरंगांत दृष्टि फेंकली म्हणजे असें स्पष्ट आढळतें कीं, अखिल जीवन हाच प्रकृतीचा एक विराट् योग असून, आपल्या सुप्त शक्तींचें अधिकाधिक प्रगटीकरण करून पूर्णत्व प्राप्त करून घेण्याचा व आपल्या दिव्य स्वरूपाशीं एकरूप होण्याचा प्रकृतीचा प्रयत्न चाललेला आहे. विचारशक्तीनें संपन्न असणारा मनुष्य हें प्रकृतीनें पहिल्यानेंच या भूतलावर जाणीवपूर्वक वावर करणारें उपकरण निर्मिलें असून तें सूत्रबद्ध कार्य घडवून आणूं शकतें. ह्याच साधनाच्या साहाय्यानें प्रकृति आपलें ध्येय द्रुतगतीनें गाठूं पहात आहे. स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें योग म्हणजे एकाच आयुष्यांत किंवा थोडक्या वर्षांत किंबहुना कांहीं थोड्या महिन्यांतहि स्वतःचें विकसन पूर्ण करण्याचें साधन आहे. विश्वजननी आपल्या विशाल ध्येयगामी चालीमध्यें ज्या साधनांचें मोकळेपणें, रमतगमत, संथपणें अवलंबन करतें व ज्यामध्यें वरवर पाहूं जातां बऱ्याच द्रव्याचा व शक्तीचा अपव्यय होतो, पण वस्तुतः पूर्णतर गुंफण बांधली जात असते, अशापैकीं एकादें साधन किंवा शक्ति निवडून तिचा उपयोग करणें किंवा त्या सर्व साधनांचा द्रुतगतीनें व प्रभावी रीतीनें उपयोग करणें हेंच कोणत्याहि विशिष्ट योगपद्धतीचें स्वरूप असणार. योगाबद्दलचा हा दृष्टिकोनच योगमार्गांच्या मजबूत व पूर्ण शुद्ध समन्वयाचा पाया होऊं शकेल. कारण मग योग म्हणजे कांहींतरी गूढ व लोकविलक्षण प्रकार असून जगत्चालक महाशक्तीच्या दैनंदिन सामान्य क्रियापद्धती आणि स्वसंकल्पपूर्तीसाठीं तिनें चालविलेल्या विश्वगत महान् प्रयत्नांशीं त्याचा कांहींच संबंध नाहीं असा जो दृष्टिकोन आहे तो पालटून उलटपक्षीं, प्रकृतीनें ज्या शक्ती आपल्या नेहमींच्या कार्यांत सामान्यतः प्रगट केल्या आहेत वा ज्या ती करत आहे त्यांचाच जोरकस आणि आश्चर्यजनक उपयोग करण्याचा मार्ग असा त्याचा अर्थ उघड होतो.

भौतिक विद्या, विद्युत् वा वाफ यांच्या स्वाभाविक प्रक्रियांचा शास्त्रशुद्ध उपयोग करून ज्याप्रमाणें त्यांच्याकडून नित्याचीं अनेक कार्यें घडवून आणतां येतात त्याचप्रमाणें योगमार्गहि मनुष्याच्या नैसर्गिक मनोव्यापारांना वळण लावत असतात. ह्या सर्व मार्गांची मांडणी अनेक

प्रयोग करून, व्यावहारिक विश्लेषण करून व परिणामांचा पुनःपुनः पडताळा पाहूनच विकसित व निश्चित झाली आहे. उदाहरणार्थ, राजयोगाचें तंत्र अशा अवलोकनावर व अनुभवावर आधारित आहे कीं, आपलें अंतःकरण, संस्कार, आंतरिक कार्यें व शक्ती पृथक् व विलीन करतां येतात, त्यांची नवरचना करून अपूर्व व अशक्यप्राय कार्यें त्यांच्याकडून घडवितां येतात किंवा त्यांचें परिवर्तन करून विशिष्ट आंतरिक प्रक्रियांच्या द्वारां सर्वसामान्य समन्वय साधतां येतो. हठयोगाचाहि असा अनुभव व अवलोकन आहे कीं, ज्या प्राणशक्तींच्या व्यापारानीं व नियमानीं आज आपलें आयुष्य सामान्यतः जखडलें गेलें आहे व ज्यांचा मार्ग निश्चित असून त्यावांचून आपले चालतच नाहीं त्या शक्तीवरही प्रभुत्व मिळवून त्यांचें कार्य बदलतां वा तात्पुरतें थांबवतां येतें व अन्यथा अशक्य असणारें व ज्यांना ह्या क्रियांचें मर्म अवगत नाहीं त्यांना अद्‌भूत वाटणारे परिणाम घडवितां येतात. आतां, योगाच्या दुसऱ्या कांहीं शाखांमध्यें असे चमत्कार सहजासहजीं आढळत नाहींत हें खरें आहे; कारण त्यांच्यामध्यें यांत्रिक प्रक्रियांपेक्षां अंतःप्रेरणांचा भाग जास्त असतो. उदा. भक्तियोग हा एकदम परमानंदालाच मिठी मारतो तर ज्ञानयोग अनंत ब्रह्मज्ञानांत व चेतनेंत स्थिरावतो. परंतु हे मार्गही आपल्यामधील एखादें महत्त्वाचें अंग घेऊनच नित्याच्या उत्स्फूर्त प्रवाहांत लवकर न उमगणाऱ्या त्या अचिंत्य ध्येयाकडे आगळ्याच मार्गांनीं धांव घेतात. योग ह्या सामान्य संज्ञेनें संबोधिले जाणारे हे सर्व पंथ म्हणजे निसर्गाच्या शाश्वत सत्यावर आधारलेले विशेष मनोवैज्ञानिक मार्ग असून सामान्य जीवनप्रवाहांत वास्तविक जे गुणधर्म, शक्ती व परिणाम सुप्तपणें असतात, परंतु ज्यांचे अस्तित्व जाणवत वा प्रगट होत नाहीं त्यांचीच ते जोपासना करत असतात.

परंतु भौतिक विद्येमध्यें ज्याप्रमाणें भिन्न भिन्न शास्त्रीय पद्धतींचे दुष्परिणाम आढळतात उदा० जसा कृत्रिमतेचा सार्वत्रिक वरपगडा वाढून मानवाचे नैसर्गिक जीवन यंत्राच्या भाराखालीं दबून जाते वा कांहीं स्वातंत्र्य व स्वामित्व ह्यांच्या खरेदीसाठीं वाढत्या गुलामीचें नाणें मोजावें लागते; तद्वतच योगाच्या विभिन्न पद्धतींशीं व अद्‌भुत परिणामांशींच जास्त हुज्जत घालत बसण्याचेही कांहीं दुष्परिणाम व तोटे आहेत. योगी सामान्य जीवनापासून पराङ्मुख होऊं लागून त्यावरील त्याची पकड ढिली होऊं लागते. मानवी कार्यशक्तींचा मोबदला देऊन आध्यात्मिक संपन्नता तो मिळवूं पहातो. अंतर्गत स्वातंत्र्य संपादितांना बाह्य मरण त्याला कवटाळूं लागतें. ईश्वर मिळतो तर जीवनच संपुष्टांत येतें व जीवनावर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करावा तर देव दडतो, अशी त्याची भयानक अवस्था होते. म्हणूनच हिंदुस्थानामध्यें आधिभौतिक व आध्यात्मिक विकास आणि पूर्णत्व हे दोन परस्परविभिन्न मार्ग मानले गेलेले आपण पहातो. आणि अंतर्गत ओढ व बाह्य आवश्यकता ह्यांच्यामध्यें मेळ घालून प्रपंच व परमार्थ ह्या दोहोंतही विजय संपादन करावा अशी परंपरा व आदर्श असला तरी तसें उदाहरण क्वचित्‌च आढळतें. प्रत्यक्ष व्यवहारांत असें दिसतें कीं, जेव्हां एखादा मनुष्य आपली दृष्टि व कार्यशक्ति अंतर्मुख करून योगाच्या मार्गावर आरूढ होऊं पहातो त्यावेळीं सामूहिक जीवनाचा श्रेष्ठ प्रवाह व मानवजातीचा आधिभौतिक प्रयत्न ह्यांना त्यास अगतिकपणें मुकावें लागणार असें समजलें जातें. ह्या कल्पनेचें वर्चस्व इतकें जबरदस्त आहे व चालूं तत्त्वज्ञानांनीं व धर्मपंथानीं त्याची इतकी तरफदारी केली आहे

कीं सामान्य जीवनांतून उठणें ही योगाची केवळ अपरिहार्य आवश्यकताच नव्हे तर तेंच सामान्य ध्येयहि आहे असें समजलें जातें. परंतु कोणताही योग जोंपर्यंत ईश्वर व निसर्ग ह्यांना एकाच आत्मरंगांत रंगवून मुक्तावस्थेंतील परिपूर्ण व्यवहार हें आपलें ध्येय ठेवत नाहीं वा आपल्या मार्गामध्यें अंतर्गत व बाह्य व्यापारांचा व अनुभवांचा मेळ घालण्याची परवानगीच नव्हे तर त्यांना एकाच ब्रह्मरसामध्यें समरस करण्याचा स्पष्ट आदेश देऊन दोहींनाही परमेश्वरत्व प्राप्त करून देत नाहीं तो योग समन्वय या नांवाला पात्रच होऊं शकत नाहीं. कारण ह्या अधिभौतिक संसारांत जें महान् सत्य अवतरण पावलें आहे त्याचें मनुष्य हेंच प्रतीक व गमक असून त्याच्यामध्येंच अपरा प्रकृति परिवर्तित होऊन परा प्रकृतीचा धर्म धारण करूं शकते व परा प्रकृतीलाही अपरा प्रकृतींत उतरून आपला साक्षात्कार घडवितां येतो. ही शक्यता साधण्यासाठींच आयुष्य प्रदान करण्यांत आलें आहे. मग त्याचाच धिक्कार करणें हीच गोष्ट योगमार्गांतील अनिवार्य आवश्यकता वा त्याच्या श्रेष्ठतम उद्योगाचें अंतिम पूर्ण ध्येय व आत्मविकसनाचा प्रभावी मार्ग समजणें पूर्णतः चुकीचें ठरेल. एखाद्या परिस्थितीवर तात्पुरता इलाज वा सर्व मानवजातीला प्रगति करणें शक्य व्हावें म्हणून एखाद्या व्यक्तीला करावा लागणारा विशेष आत्यंतिक प्रयत्न ह्यासाठीं तें आवश्यक असूं शकेल. परंतु योगाचें सत्य व पूर्ण ध्येय आणि उपयुक्तता ही तेव्हांच सिद्ध आली असें म्हणतां येईल कीं ज्यावेळीं मनुष्याची ज्ञानयुक्त योगसाधना निसर्गाच्या, अ-जाणीवपूर्वक योगसाधनेप्रमाणें सर्व बाह्य जीवनाशीं एकरूप होऊन सर्वच वाटचालीचे व सिद्धींचे सिंहावलोकन करून संपूर्ण आत्मविश्वासानें पुन्हां एकदां अधिकारयुक्त गर्जना करील कीं, "**अखिल जीवन हा योगच**."

SABCL Vol 20 : Pages 1-4

स्वावलंबन

(विद्यार्थ्यांसाठीं)

प्राचीन काळच्या अरब लोकांमध्यें हातीमताई (Hatim Tai) त्याच्या उदारतेबद्दल व दानशीलतेविषयीं अति प्रसिद्ध होता.

एकदां त्याच्या मित्रांनीं त्याला विचारलें "तुमच्यापेक्षां अधिक भला माणूस तुम्हांस भेटला आहे काय ?"

"होय". त्यानें उत्तर दिलें.

"कोण होता तो ?"

"मीं एकदां एका मेजवानीसाठीं चाळीस उंट कापविलें होते. ज्याला पाहिजे त्यानें मेजवानीस यावें असें कळविलें होतें. बरोबर कांहीं सरदार घेऊन दूरच्या मंडळींना निमंत्रण देण्यासाठीं मी निघालों. वाटेंत एक लांकूडतोड्या भेटला. एका कांटेरी झाडाचीं नुकतींच एक मोळीभर लांकडें त्यानें तोडलीं होतीं. तेंच त्याच्या उपजीविकेचें साधन होतें. गरीब दिसला बिचारा, म्हणून मीं त्याला विचारलें, "हातीमताई इतक्या मेजवान्या देत आहे तिथें कां नाहीं गेलास तूं ?"

तो म्हणाला, "जो स्वतःची भाकरी स्वतः कष्ट करून मिळवितो त्याला हातीमताईच्या मेजवान्यांची काय जरूरी ?"

त्या लांकूडतोड्याला स्वतःपेक्षां भला माणूस असें हातीमताईनें कां म्हटलें ?

कारण दुसऱ्याला नुसत्या देणग्या देत बसण्यापेक्षां स्वतः कष्ट करून स्वतःचा उदरनिर्वाह करणें हें लांकूडतोड्याला अधिक मानाचें वाटत होतें. दुसऱ्याला देणग्या देण्यासाठीं कांहीं परिश्रम पडत नाहींत किंवा फारसा त्याग करावा लागत नाहीं. शिवाय त्यामुळें मदत घेणारांना नुसतें स्वस्थ बसण्यास प्रोत्साहन दिल्यासारखेंहि होतें.

अर्थात् मित्रांनीं परस्परांना भेटी द्याव्यात हें अगदीं स्वाभाविक आहे. दीन दुःखी लोकांना मदत देण्यासाठीं बलवान् लोक पुढें आले पाहिजेत हेंहि खरें. पण दणधाकट आणि बळकट माणसानें स्वतःचें काम स्वतःच्या हातानेंच केलें पाहिजे. दुसऱ्यांकडे भीक मागण्यासाठीं हात पसरतां कामां नये. मात्र एक गोष्ट या ठिकाणीं लक्षांत ठेवली पाहिजे ; ज्यांनीं स्वतःचें जीवन सर्वस्वीं मनन चिंतनासाठीं किंवा गभीर सत्य शोधनासाठीं, ज्ञानप्राप्तीसाठीं वाहून घेतलें असेल त्यांची गोष्ट निराळी.

लांकूडतोडयाचें वर्तन तर उदात्त होतेंच पण त्याहून अधिक उदात्त वर्तन एका पर्शियन राजपुत्राचें होतें. त्याची गोष्ट अशी—

फार प्राचीन काळीं हा राजपुत्र होऊन गेला. त्याचें नांव गुश्ताप. गादीचा वारस या नात्यानें त्याचें वडील त्यास वागवत नसत म्हणून तो फार चिडून गेला होता. त्यानें आपली जन्मभूमि सोडून देऊन पश्चिमेकडे प्रवास करण्यास सुरुवात केली.

एकटाच बाहेर पडल्यांनतर त्याची उपासमार होऊं लागली. तेव्हां त्याच्या लक्षांत आलें कीं आतां आपल्याला स्वतःच्याच पायावर उभें राहिलें पाहिजे. पुढें तो एका जमीनदाराकडे गेला आणि त्याला म्हणाला "मला चांगलें लिहितां येतें. तुम्हीं मला कारकून म्हणून लावून घेतलेंत तर फार बरें होईल."

जमीनदारानें सांगितलें "कांहीं दिवस थांब. सध्यां कांहीं आम्हांला कारकुनाची गरज नाहीं." पण गुश्तापची इतकी उपासमार चालली होती कीं त्याला थांबणें शक्य नव्हतें. म्हणून तो कांहीं उंटवाल्यांकडे गेला आणि काम मागू लागला. अशा अनोळखी माणसाचा त्यांना कांहीं उपयोग होणें शक्य नव्हतें ; तरीपण त्याचें दारिद्र्य व केविलवाणी स्थिति पाहून त्यांनीं त्याला थोडें खायला दिलें. पुढें गेल्यानंतर एका लोहाराच्या दुकानांत जाऊन त्यानें तिथेंहि काम करण्याची इच्छा दर्शविली. लोहार म्हणाला "बरें आहे, हा लोखंडाचा तुकडा ठोकावयाचा आहे. त्यांत कदाचित् मला तुझी मदत होते कां पाहूं." असें म्हणून गुश्तापला त्यानें एक हातोडा दिला. राजकुमार चांगलाच ताकदवान होता. त्यानें तो जड हातोडा उचलला आणि ऐरणीवर इतक्या जोरांत घांव घातला कीं एका तडाख्यांत ऐरणीचे दोन तुकडे झाले. लोहाराला भयंकर राग आला आणि तावडतोब त्यानें गुश्तापला घराबाहेर काढलें.

अत्यंत दुःखीकष्टी होऊन कामाच्या शोधार्थ राजपुत्र गुश्ताप पुनः वाट चालूं लागला. जेथें जेथें तो गेला तेथें तेथें तो निकामी ठरला; आपलें कौशल्य दाखविण्यास त्यास कुठेंच संधि मिळाली नाहीं. शेवटीं त्याला एक शिकारी भेटला. तो शेतामध्यें काम करीत होता. बिचाऱ्या गुश्तापची त्याला कींव येऊन त्यानें त्याला खायला प्यायला घातलें व निवाऱ्याची जागा दिली.

एके दिवशीं अशी बातमी सर्वत्र पसरली कीं रूम देशाच्या (Rum) राजकन्येच्या स्वयंवरासाठीं राजेघराण्यांतील सर्व राजपुत्रांना राजमहालामध्यें आमंत्रण केलेलें आहे. गुश्तापनेंहि तेथें जाण्याचा निश्चय केला. सर्वांच्या बरोबर तोहि मंडपांत जाऊन बसला. राजकन्या किताबन हिचें त्याच्याकडे लक्ष गेलें व त्याच्यावर तिचें मन जडलें. प्रेमाचें प्रतीक म्हणून तिनें एक गुलाबपुष्पांचा गुच्छ त्याला अर्पण केला.

राजाला ही गोष्ट बिलकूल आवडली नाहीं, कारण गुश्ताप अगदींच दरिद्री होता. पण आपल्या मुलीलाहि परावृत्त करण्यास तो धजला नाहीं. मात्र विवाह झाल्याबरोबर दोघांनांहि त्यानें राजवाड्यांतून घालवून दिलें. दोघेजण रहाण्यासाठीं एका जंगलांत गेले. तेथें एका नदीकाठीं त्यांनीं झोपडी बांधली.

गुश्ताप चांगल्यापैकीं शिकारी होता. नावेमध्यें बसून दररोज तो नदीच्या पैलतीरीं जाई, हरिणाची किंवा रानगाढवाची शिकार करी, शिकारीचा अर्धा वांटा नावाड्याला देई व बाकीची शिकार आपल्या बायकोसाठीं घरीं आणी.

एकें दिवशीं नावाड्यानें आपणाबरोबर मार्बिन (Marbin) नांवाच्या एका तरुणाला आणलें. त्याला गुश्तापची भेट घ्यायची होती. मार्बिन गुश्तापला म्हणाला, महाराज, तुमच्या बायकोच्या धाकट्या बहिणीशीं, राजाच्या दुसऱ्या मुलीशीं, मला लग्न करावयाचें आहे. पण त्याच्या राज्यामध्यें एक लांडगा त्रास देत आहे. त्याला मारल्याशिवाय त्या राजकन्येशीं मला लग्न करतां येणार नाहीं. आतां ही शिकार मी कशी करूं? मला तर समजत नाहीं.

"तें काम तुझ्यासाठीं मी करीन"—शिकारी गुश्ताप म्हणाला.

गुश्ताप जंगलामध्यें गेला. त्यानें लांडगा पाहिल्याबरोबर त्याच्यावर दोन बाण मारले आणि आपल्या शिकारीच्या चाकूनें त्याचें डोकें कापून काढलें.

मारलेली शिकार पहाण्यास राजा आला. त्याला आनंद झाला आणि त्यानें आपली दुसरी मुलगी मार्बिनला देऊन टाकली.

कांहीं दिवसांनतर नावाड्यानें आणखी एक, अहरुन नांवाचा तरुण आपल्याबरोबर आणला. राजाच्या तिसऱ्या मुलीशीं त्याला लग्न करण्याची इच्छा होती. पण त्यापूर्वीं एक अजगर मारणें त्याला भाग होतें. 'हें कठीण काम मी करीन' असें गुश्तापनें त्यालाहि वचन दिलें.

गुश्तापनें कांहीं चाकू घेऊन त्याचा एक चेंडू बनविला. चाकूंचीं धारदार टोंकें सगळ्या बाजूंनीं बाहेर आलीं होतीं. नंतर अजगर शोधून काढण्यासाठीं तो निघाला. जंगलामध्यें एक अजगर त्याच्या दृष्टीस पडला. अजगराच्या श्वासाबरोबर अग्नीच्या ज्वाळा बाहेर पडत होत्या. त्या अजस्त्र अजगराच्या शरीरामध्यें त्यानें कांहीं बाण फेंकले, मात्र आपण स्वतः त्याच्या तांवडींत सांपडूं नये म्हणून तो इकडून तिकडे उड्या मारीत होता. नंतर त्यानें एका भाल्याच्या टोंकावर तो चाकूंचा चेंडू बसविला आणि एकदम अजगराच्या उघड्या जबड्यांत खुपसला. अजगरानें तोंड मिटल्याबरोबर तो मरून पडला. मग राजकुमारानें आपल्या तलवारीनें त्याचे तुकडे तुकडे केले.

अशारीतीनें अहरूनचा राजाच्या तिसऱ्या मुलीशीं विवाह झाला.

पर्शियाच्या गादीचा वारस म्हणून वडिलांच्या नंतर हा शूर राजपुत्र, गुश्ताप गादीवर बसला असें सांगितलें तर तुम्हांला त्यांत कांहींच आश्चर्य वाटणार नाहीं. त्याच्याच कारकीर्दीत पार्शी धर्माचा आद्य संस्थापक झरतुष्ट्र हा होऊन गेला. अहुरमझ्द हा त्यांचा देव प्रकाश, अग्नि आणि सूर्य यांचा स्वामी आहे; सत्य, सदाचार आणि न्याय यांचाहि तो देव आहे. या देवाची भक्ति करण्यास शिकविणारा धर्म झरतुष्ट्रानें पार्शी समाजाला दिला.

★

गुश्तापला जगामधील आपलें स्वतःचें स्थान आणि काम कांहीं एकदम सांपडलें नाहीं, हें तुम्हीं पाहिलेंच. कित्येक गोष्टी त्यानें करून पाहिल्या पण तो त्यांत यशस्वी झाला नाहीं. एवढेंच नव्हे तर आपल्या लोहाराप्रमाणें सुरुवातीला कित्येक लोकांची त्याच्यावर गैरमर्जीहि झाली.

कांहीं असो, शेवटीं त्याला त्याचें योग्य स्थान मिळालें; त्यानें चांगल्या तऱ्हेनें राज्य केलें आणि राजा होण्यापूर्वी दुसऱ्याहि कांहीं लोकांना तो मदत करूं शकला.

आपल्या गोष्टींतील लांकूडतोडयापेक्षां तो श्रेष्ठ होता; कारण हेंच कीं, तो दुसऱ्या अनेक लोकांच्या उपयोगी पडला होता आणि आपला लांकूडतोडया मात्र केवळ स्वतःसाठींच काम करण्यामध्यें संतुष्ट होता. उदारचरित हातीमताई पेक्षांहि गुश्ताप श्रेष्ठ होता कारण हातीमताईनें अधिक असलेल्या संपत्तींतून फक्त दान केलें ; पण या पर्शियन राजपुत्रानें मात्र शारीरिक बलाचें दान केलें, कष्टाचें दान केलें, एवढेंच नव्हे तर दुसऱ्याच्या कल्याणासाठीं स्वतःचे प्राणहि धोक्यांत घातले.

जो मनुष्य स्वावलंबी असतो आणि स्वतः प्रयत्न करून केवळ स्वतःच्याच गरजा भागवितो असें नव्हे तर आपल्या भोंवतालच्याहि लोकांच्या सुखासमाधानांत जो भर घालतो तो मनुष्य खरोखरीच सर्वांत अधिक सन्माननीय होय.

खरोखर असा पिता धन्य होय, जो आपल्या सर्व प्रकारच्या कर्तबगारीनें सुख समाधान मिळवितो व त्याचबरोबर आपल्या मुलाबाळांनाहि सुख समाधान निर्माण करून देतो. मग असा, पिता, इंजिनिअर असो वा लांकूडतोडया असो, लेखक असो वा शेतकरी असो, व्यापारी असो, लोहार असो किंवा अज्ञात देश शोधून काढणारा असो.

तो कामगार धन्य होय जो आपल्या मित्रांच्या साहाय्यानें कारखाने, सहकारी संस्था, व्यापारी संघटना संघटित करतो आणि स्वतःच्या हिताबरोबरच सहकाऱ्यांचेंहि हित साधतो. अशा संस्थांमध्यें प्रत्येकजण आपल्या अधिकारांची मागणी सामुदायिकरीत्या हक्कानें करूं शकतो. एकटीच व्यक्ति असेल तर तिचा आवाज, तिची मागणी फारच कमजोर आणि दुबळी ठरते, उलट तीच व्यक्ति समुदायामध्यें असली म्हणजे तिचा आवाज प्रभावशाली होतो. ह्या कामगार संघटना कामगारांना स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून रहाण्यास, त्याचबरोबर परस्परांनाहि मदत करण्यास शिकवितात.

बाल विद्यार्थ्यांनो ! शिक्षकांनीं जें काम, जो अभ्यास दिला असेल तो करीत असतांना तुमच्या मनःशक्तींचा उपयोग करून तुम्हींहि त्यांचा विकास करण्यास शिका; आणि ज्ञानसोपानावर एक एक पाऊल वर चढत असतांना, तुमच्याहून बुद्धीनें मंद व शक्तीनें दुर्बल असणाऱ्या तुमच्या साथीदारांनाहि वेळोवेळीं हात द्या.

अद्भुत चमत्कारांच्या पऱ्यांच्या गोष्टींमध्यें केवळ एकादा शब्द उच्चारल्यानें, जादूचा दिवा घासल्यानें किंवा यक्षिणीची कांडी फिरविल्यानें देवदूत अवतरतात. ते मनुष्याला घेऊन आकाशांत उंच भरारी मारतात, डोळ्याचें पातें लवण्याच्या आंत राजवाडे बांधतात आणि नुसत्या जमिनींतून घोडे आणि हत्ती यांचें सैन्य उत्पन्न करतात.

परंतु मनुष्य स्वतःच्या प्रयत्नानें यांहूनहि मोठे चमत्कार घडवून आणतो. तो स्वप्रयत्नानें पृथ्वीला फळा-फुलांनीं सजवितो; हिंस्र, रानटी पशूंना माणसाळवितो; पर्वतराजींमधून रस्ते काढतो आणि पूल व बंधारे बांधतो, शहरें वसवितो. समुद्रावरून इकडून तिकडे जहाजें पाठवितो, आकाशांत विमानें उडवीत नेतो. सर्वांनाच त्यामुळें अधिक सुरक्षितता व स्वास्थ्य लाभतें.

याच स्वप्रयत्नामुळें, स्वावलंबनामुळें मनुष्य अधिक सज्जन, अधिक न्यायी आणि दयाशील होतो; यामध्येंच खरी उन्नति सामावलेली आहे. ——श्रीमाताजी

CWMCE Vol 02 : Page 188

महाभारत आणि रामायण

विशेषतः महाभारत ही केवळ भरतवंशजांची एक कथा नाहीं. राष्ट्रीय परंपरेचे जिला पुढें स्वरूप आलें अशा एका प्राचीन घटनेवरील केवळ तें एक महाकाव्य नाहीं; तर भारताचा आत्मा, त्याची धार्मिक व नैतिक मनोवृत्ति, त्याचे सामाजिक व राजकीय आदर्श, **भारतीय संस्कृति व भारतीय जीवन प्रतिबिंबित करणारें फार विस्तृत प्रमाणांतील तें एक महाकाव्य आहे.** "भारतामध्यें जें जें कांहीं आहे तें तें सर्व महाभारतांत आहे." अशी एक उक्ति सर्वसामान्य जनांत प्रचलित आहे; आणि त्यांत कांहींसें तथ्यहि आहे. महाभारत ही एखाद्या व्यक्तीच्या मनाची नव्हे तर अखिल राष्ट्राच्या मनाची ती निर्मिति आणि अभिव्यक्ति आहे; संपूर्ण राष्ट्रानें स्वतःविषयीं लिहिलेलें तें एक काव्य आहे. मर्यादित उद्देश पुढें ठेवून लिहिलेल्या सापेक्षतः लहान अशा महाकाव्याला वास्तविक जे काव्यकलेचे नियम लागू पडतील ते नियम महाभारताला लावूं पाहणें निरर्थक ठरेल. तरीहि त्याच्या अंगोपांगांत त्याचप्रमाणें संपूर्ण रचनेमध्येंहि अगदीं जाणीवपूर्वक व महान् अशा कलेचा उपयोग केलेला आहे. संपूर्ण काव्याची उभारणी एकाद्या विशाल, भव्य राष्ट्रीय मंदिराप्रमाणें असून त्याच्या दालना दालनांमधून काव्याची प्रचंड आणि गुंतागुंतीची विचारधारा हळुंहळुं उलगडत गेली आहे. अर्थपूर्ण समूह-चित्रें, मूर्ती आणि कोरीवकाम यानें हें मंदिर भरगच्च आहे; समूह-चित्रें पूर्ण दैवी किंवा अर्ध दैवी प्रमाणांत कोरलेलीं आहेत. त्यांत अशी मानवता दर्शित केली आहे जी उन्नत होऊन अतिमानवतेच्या अर्ध्या मार्गावर पोहोंचलेली आहे आणि तरीहि मानवी उद्देश, मानवी विचार व भावना यांच्याशीं एकनिष्ठ राहिलेली आहे. त्यांमध्यें आदर्श स्वर लक्षांत ठेवून त्यामानानें वास्तविकतेचा सूर एकसारखा उंचावत नेलेला आहे; ह्या जगांतील जीवन विपुल प्रमाणांत चित्रित केलें असूनहि त्याच्या पाठीमागें असलेल्या जगांतील शक्तींच्या सान्निध्याचा जाणीवपूर्वक प्रभाव त्याच्यावर पडलेला दिसत आहे. समग्र कथेमध्यें एकच सुसंबद्ध विचार अनुस्युत आहे. काव्यरूपी सोपानाच्या प्रत्येक विशाल पायरीवर तोच विचार सुस्पष्ट

केलेला आहे. अशातऱ्हेनें हा अनुस्युत विचार पुनः पुनः मूर्तिमंत झाल्यामुळें समग्र कथेला जणुं मिरवणुकीचें स्वरूप प्राप्त झालें आहे. कोणत्याहि महाकाव्याच्या आख्यानामध्यें आवश्यकच असलेली कथानकाची सुसूत्रता हेंच या काव्याचें प्रमुख आकर्षण असून तें शेवटपर्यंत टिकविलेलें आहे. काव्याची गति एकाच वेळीं व्यापक आणि सूक्ष्म आहे, त्याचा व्याप अत्यंत विस्तृत आणि सुस्पष्ट आहे, त्याचीं अंगोपांगें मनोवेधक व प्रभावशाली आहेत, त्याची शैली आणि तालबद्धता नेहमींच सरल, ओजस्वी आणि महाकाव्योचित आहे. त्यांतील सारतत्त्व परम रोचक असून काव्य-विषयाची कथनशैली सुस्पष्ट आणि हुबेहुब तर आहेच पण त्यामध्यें याहूनहि अधिक कांहींतरी आहे. **म्हणजेच त्यांत इतिहास आहे**, भारतीय जीवन आणि संस्कृति-विषयक केंद्रीभूत कल्पना व ध्येयें यांचें प्रारंभापासून अंतापर्यंत प्रतिनिधित्व करणारी एक अर्थपूर्ण कथा त्यांत आहे. त्याची प्रमुख प्रेरणा आहे धर्मविषयक भारतीय कल्पना. सत्य, प्रकाश आणि एकता यांच्या शक्ती व अंधकार, विभजन व असत्य यांच्या शक्ती यांच्यामध्यें चाललेल्या संग्रामाची जी वैदिक कल्पना आहे ती आध्यात्मिक, धार्मिक व आंतरिक स्तरांमधून बाहेर काढून, बौद्धिक, नैतिक आणि भावनात्मक पातळीवर या काव्यांत प्रकट केलेली आहे. कथेमध्यें ही संग्रामाची कल्पना दोन स्वरूपांत दिसून येते; **एक वैयक्तिक संघर्ष व दुसरा राजकीय संग्राम.** वैयक्तिक संघर्षामध्यें एका बाजूस भारतीय धर्माचे उच्चतर नैतिक आदर्श प्रत्यक्ष जीवनांत उतरविणाऱ्या आदर्शस्वरूप व प्रतिनिधिरूप व्यक्ती आहेत व दुसऱ्या बाजूस आसुरी अहंकार, स्वेच्छाबळ आणि धर्माचा दुरुपयोग या गोष्टी जीवनांत मूर्तिमान् करणाऱ्या व्यक्ती आहेत. वैयक्तिक संघर्षाची परिसमाप्ति राजकीय संघर्षामध्यें झालेली दिसते. तो एक **आंतरराष्ट्रीय संघर्ष** असून युद्ध करणाऱ्या वंशांचें एकत्रीकरण करून, राजे लोक व प्रतिष्ठित उच्चकुलीन लोक यांच्या महत्त्वाकांक्षापूर्ण उद्दामपणाच्या जागीं न्यायपूर्ण आणि लोकोपकारी साम्राज्याचे प्रभुत्व, स्वास्थ्य आणि शांति यांची प्रस्थापना करून, सत्य आणि न्याय यांची नवीन सत्ता, धर्माचें राज्य, नव्हे धर्माचें साम्राज्य प्रस्थापित होण्यामध्यें त्याचा शेवट झाला आहे. देव आणि असुर, भगवान् आणि सैतान यांच्यामध्यें चाललेला चिरंतन संघर्ष या ठिकाणीं मानवी जीवनाच्या स्वरूपामध्यें मांडलेला आहे.

एका बाजूला वैयक्तिक जीवनधारा आणि दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय जीवनसरणी दर्शविली आहे. प्रथम वैयक्तिक जीवनाची पार्श्वभूमि या स्वरूपामध्यें आणि नंतर राज्यें, सैन्यें, आणि राष्ट्रें यांच्या आंदोलनाच्या रूपानें रंगभूमिवर येणारें राष्ट्रीय जीवन रेखाटलें आहे. संघर्षाचें हें दुहरी स्वरूप ज्या पद्धतीनें प्रकट केलें आहे त्या पद्धतीवरून असें दिसून येतें कीं भारतीय स्थापत्यशास्त्रामध्यें परिश्रमपूर्वक मिळविलेल्या रचनाकौशल्याशीं जिची तुलना करतां येईल, अशी उच्च प्रकारची रचना कौशल्य-शक्ति या ठिकाणीं काव्यक्षेत्रामध्यें अवतीर्ण झाली आहे; संपूर्ण महाभारताचीच रचना विशाल काव्यात्मक कला व अंतदृष्टि यांच्या साहाय्यानें केलेली आहे. अफाट अवकाश एका सर्वग्राही विशाल दृष्टिकोनांतून व्यापून टाकण्याची शक्ति येथें दिसून येते. त्याचबरोबर हा अफाट व्याप सूक्ष्म, परिणामकारक, हुबेहुब आणि महत्त्व-पूर्ण अशा तपशीलवार माहितीनें भरून टाकण्याचीहि प्रवृत्ति येथें दिसून येते. आख्यानाच्या कक्षेमध्यें महत्त्वाचा भाग म्हणून अन्य कथा, दंतकथा, उपाख्यानें यांचाहि समावेश केलेला आहे. या बहुतेक सर्व कथा इतिहासपद्धतीला उपयुक्त अशा अर्थपूर्ण स्वरूपाच्याच आहेत.

त्याचबरोबर तत्त्वज्ञानात्मक, धार्मिक, नैतिक, सामाजिक व राजकीय विचार विपुलतेनें यामध्यें समाविष्ट केलेले आहेत. हे विचार कधीं स्पष्ट स्वरूपांत प्रतिपादन केले आहेत, तर कधीं दंतकथा आणि उपाख्यान यांच्या स्वरुपांत. उपनिषदें व महान् दर्शनें यांमधील विचारहि मधून मधून वारंवार आणलेले आहेत ; एवढेंच नव्हे तर कधीं कधीं त्यांचा नवीन स्वरूपामध्यें विकासहि केलेला आहे. उदाहरणार्थ गीता. धार्मिक गाथा आणि कथा, धर्मभावना व शिकवण याच्या रोमरोमीं ओतप्रोत भरलेली आहे; समाजाचे नैतिक आदर्श एक तर स्पष्टपणें वर्णन केले आहेत किंवा एखाद्या कथेचा अथवा उपाख्यानाचा आकार देऊन त्याचें स्वरूप बदलवून टाकलें आहे; अथवा एकाद्या गोष्टीमधील पात्रांच्या द्वारां ते आदर्श मूर्तिमान् केले आहेत; राजकीय आणि सामाजिक आदर्श, प्रथा आणि संस्था यांचाहि अशाचरीतीनें विकास करून अत्यंत हुबेहुब, जिवंत व अत्यंत स्पष्ट स्वरूपांत त्यांचें रेखाटन केलें आहे; त्याचबरोबर जनतेच्या जीवनाशीं संबंधित अशा सौंदर्यात्मक अथवा अन्य संकेतानांहि यामध्यें स्थान मिळालेलें आहे. महाकाव्याच्या कथानकामध्यें या सर्व गोष्टी अद्‌भुत कौशल्यानें व सुसूक्ष्मरीतीनें एकमेकांत गुंफलेल्या आहेत. अशा या संकीर्ण स्वरूपाच्या रचनेमध्यें आणि अनेक भिन्न भिन्न, कमी अधिक योग्यतेच्या कवींनीं ज्यामध्यें आपापली भर टाकली आहे अशा या कार्यामध्यें कांहीं विषमता, असमतोल किंवा सुसूत्रतेचा अभाव असल्यासारखें भासणें अनिवार्य आहे. परंतु संपूर्ण योजनेच्या व्यापक, प्रचंड जटिलतेमध्यें या विभिन्नतापूर्ण गोष्टींना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें योग्य तें स्थान प्राप्त झालेलें आहे. त्यांच्यामुळें समग्र दर्शनामध्यें, मनावर साकल्यानें होणाऱ्या परिणामांत मात्र कमतरता येत नाहींच; उलट मदतच होते. **ही संपूर्ण कृति म्हणजे भारतीय जनतेचा समग्र आत्मा, विचारधारा आणि जीवनसरणी यांची एक काव्यमय अभिव्यक्ति असून तिची ओजस्विता आणि सर्वांगपूर्णता तर अद्वितीयच आहे.**

रामायणहि सारतः महाभारताच्याच तोडीचा ग्रंथ आहे. भेद येवढाच आहे कीं त्याची रचना सापेक्षतः अधिक सरळ आहे, त्यांतील आदर्शात्मक प्रवृत्ति-प्रकृति अधिक हळुवार आणि त्यांतील काव्यात्मक ऊब आणि रंगछटा यांची दीप्ति अधिक सुंदर आहे. या काव्यामध्यें जरी प्रक्षिप्त भागहि बराच असला तरी अधिक भाग हा एकाच व्यक्तीनें रचिलेला आहे हें उघड आहे. यामध्यें रचनेची सुसूत्रता कमी गुंतागुंतीची आणि अधिक स्पष्ट आहे. तत्त्वज्ञानाच्या मनोवृत्तीपेक्षां विशुद्ध कवि-मन अधिक आहे. कलाकार अधिक आहे; निर्माता कमी. संपूर्ण कथा सुरुवातीपासून शेवटपर्यंत अखंड असून कथानकाचें मूळ सूत्र कधींहि सुटलेलें नाहीं. पण त्याचबरोबर महाभारताप्रमाणें त्यांतहि अंतर्दृष्टीची विशालता आहे, महाकाव्यांतील वैचारिक उदात्ततेची गगनविहारी भरारी आहे; व तो विचार अंगोपांगांतहि सूक्ष्मरीतीनें कार्यान्वित करण्याची सर्वत्र एकसारखी प्रचुरता आहे. महाभारताची रचना-कौशल्य-शक्ति, समर्थ कारागिरी आणि क्रम-पद्धति या गोष्टी भारतीय गृहशिल्पज्ञांच्या कलेचें स्मरण करून देतात तर उलट रामायणाचें रूपरेखेचें वैभव व स्पष्टता, विविध रंगसंपदा आणि सूक्ष्म, आलंकारिक लेखनपद्धति यांमुळें भारतीय चित्रकलेचा भाव आणि शैली याठिकाणीं विशेषतः साहित्यक्षेत्रांत प्रतिबिंबित झाल्याचा भास होतो. या महाकाव्याच्या कवीनेंहि आपल्या रचनेमध्यें, **इतिहास** म्हणजेच एका प्राचीन भारतीय वंशाशीं संबद्ध असलेली एक

पुरातन कथा किंवा आख्यायिका आपल्या काव्याचा विषय म्हणून घेतलेली असून पौराणिक कथा व लोक-कथा यांच्या तपशीलवार माहितीनें ती समृद्ध केली आहे. परंतु महाकाव्योचित उच्च उद्देश आणि अर्थपूर्णता यांना साजेशी रचना व्हावी म्हणून या सर्व गोष्टींना कवीनें एका उदात्त महाकाव्यात्मक चित्रणाच्या पातळीवर चढविलेलें आहे. याचा विषय महाभारता-सारखाच आहे; **पार्थिव जीवनामध्यें दानवी शक्तींबरोबर दैवी शक्तींचा संघर्ष**; परंतु अधिक शुद्ध आदर्श स्वरूपांत; त्याचप्रमाणें अतिलौकिक प्रमाणांत हा विषय स्पष्टपणें मांडलेला असून मानवी स्वभावांतील शुभ आणि अशुभ दोन्हीं प्रकारच्या वृत्तींना कल्पनेच्या राज्यामध्यें उंच उंच चढविलेलें आहे. एका बाजूला चित्रित केलें आहे आदर्श मानवत्व, सद्गुण आणि नैतिक सुव्यवस्था यांचें दिव्य सौंदर्य, धर्मावर अधिष्ठित झालेली, नैतिक आदर्शाचें अत्युच्च स्वरूप शिरोधार्य मानणारी संस्कृति. शिवाय हा आदर्शंहि मनाला ज्याचें प्रबळ आकर्षण असतें अशा सुरुचिपूर्ण सौंदर्य, सामंजस्य आणि माधुर्य यांच्या स्वरूपांत अपूर्वरीतीनें रेखाटला आहे. उद्दाम हिंसावृत्ति, स्वार्थी लालसी व अमानुष अहंकार यांनीं युक्त अशा क्रूर, अरा-जकप्रिय व आकाररहित, विलक्षण शक्ती दुसऱ्या बाजूस आहेत. मानसिक प्रकृतीच्या या दोन विचार प्रवाहांना व शक्तींना जिवंत व साकार करून त्यांच्यामधील संघर्ष दाखविला आहे व शेवटीं त्याचा अंतिम निर्णय म्हणून त्यामध्यें देव-मानवानें राक्षसावर विजय मिळ-विलेला आहे. काव्याच्या प्रधान विचाराची एकांतिक शुद्धता, पात्रांच्या रूपरेषेद्वारां प्रदर्शित केलेली प्रतिनिधीरूप शक्ति, व्यक्तींच्या स्वभावधर्माप्रमाणें दिलेल्या रंगछटांचें महत्त्व ज्यामुळें कमी होईल अशा सर्व छटा व गुंतागुंत वगळून काव्याचें आकर्षण आणि गूढार्थ यांना मानवीरूप देण्याच्या दृष्टीनें आवश्यक तेवढयाच गुंतागुंतीचा व रंगछटांचा स्वीकार केलेला आहे. आपल्या जीवनाच्या पाठीमागें असलेल्या प्रचंड शक्तींची, कवि आपल्याला जाणीव करून देत आहे आणि महाकाव्योचित भव्य दृष्यावलि, महान् राजनगरी, पर्वतराजी आणि सागर, अरण्यें आणि मरु प्रदेश या सर्व गोष्टींचें वर्णन कवीनें इतकें विस्तारपूर्वक केलें आहे कीं असें वाटतें, जणुं संपूर्ण जगत् हाच त्या काव्याचा दृष्यपट झाला असून कांहीं महान् व भीषण पात्रांच्या द्वारें मूर्तिमंत केलेली, मानवी स्वभावाची, संपूर्ण दैवी अथवा संपूर्ण आसुरी बनण्याची शक्यता हा त्याचा काव्यविषय झाला असावा. याठिकाणीं भारताचें नैतिक व सौंदर्यरसिक मन यांचा सामंजस्यपूर्ण परस्परसंयोग होऊन त्यानें आत्माविष्काराची अभूतपूर्व विशुद्ध व्यापकता व सुंदरता यांची अत्युच्च पातळी गांठलेली आहे. **रामायणानें भारतीय कल्पनाशक्तीसाठीं उच्च-तम आणि कोमलतम मानवी स्वभावाचे आदर्श मूर्तिमान् करून दाखविले आहेत.** बल, साहस, सज्जनता, पावित्र्य, विश्वास-पात्रता, स्वार्थत्याग यांचा परिचय भारतीय मनाला अत्यंत मनोरम आणि अत्यंत सामंजस्यपूर्ण व्यक्तींच्या द्वारां करून दिला आहे. हीं पात्रें अशारीतीनें रंगविलीं आहेत कीं, त्यामुळें भावना आणि सौंदर्यदृष्टि यांना आकर्षण वाटावें. नैतिक नियमां-मधील एकतर घृणाजनक कठोरवृत्ति किंवा त्यांतील अगदींच सामान्यपणा कवीनें काढून टाकून जीवनांतील सामान्य गोष्टींनाहि, म्हणजेच पतिपत्नीमधील प्रेम, मातृप्रेम, भ्रातृप्रेम, वात्सल्य यांना, त्याचबरोबर राजा व नेता यांचें कर्तव्य, प्रजा आणि अनुयायी यांची राज-भक्ति व निष्ठा, महान् व्यक्तींची थोरवी आणि साध्याभोळया लोकांचें सत्य स्वरूप व महान-ता या सर्व गोष्टींना एक प्रकारचें उच्च, दिव्य स्वरूप प्रदान केलें आहे; आपल्या आदर्श

रंगछटांच्या तेजानें उजळून नैतिक गोष्टींना अधिक आंतरात्मिक अर्थाचें सौंदर्य-लेणें चढविलें आहे. भारताच्या सांस्कृतिक मनास आकार देण्यामध्यें वाल्मीकीची ही कृति म्हणजे अपरिमित शक्तीनें युक्त असें एक साधन ठरलेली आहे. राम आणि सीता, त्याचप्रमाणें हनुमान्, लक्ष्मण किंवा भरत यांसारख्या पात्रांच्या रूपानें आपले नैतिक आदर्श जिवंत मानवी व्यक्तींच्या द्वारें भारतीयांच्या मनासमोर त्यानें मूर्तिमान् केले आहेत, याकरितां कीं भारतीय मनानें त्यांवर प्रेम करावें, त्यांचें अनुकरण करावें; राम आणि सीता हीं पात्रें इतक्या दिव्य स्वरूपांत आणि मूळ सत्याची इतकी हुबेहुब अभिव्यक्ति करणारीं अशीं त्यानें वर्णन केलीं आहेत कीं, तीं स्थायी भक्तीचें आणि पूजेचें दैवत व्हावींत; राष्ट्रीय स्वभावधर्मामध्यें जें कांहीं सर्वोत्तम आणि मधुरतम दिसून येतें त्या बहुतेक सर्व गोष्टींचा अंतर्भाव या कृतीमध्यें झालेला आहे; आणि या सर्वांपेक्षांहि सद्‌गुण आणि आचारव्यवहार यांच्या प्रचलित बाह्य स्वरूपाहून अधिक मौल्यवान् असलेले असें सूक्ष्मतर व सर्वोत्कृष्ट, त्याचबरोबर सुदृढ, आत्म-स्वर आणि अधिक सुकोमल मानव-प्रकृति यांना आवाहन करून त्यांना आपल्या कृतींमध्यें वाल्मीकीनें सुप्रतिष्ठित केलें आहे.

—श्रीअरविंद (भारतीय संस्कृतीचे आधारः–मधून)

SABCL Vol 14 : Page 286

साधना आणि बौद्धिक विकास

विद्यार्थ्यांसाठीं

श्रीअरविंदांच्या पत्रांमधून

साधना आणि मनोविकास :—

ज्याला साधना करावयाची, त्यानें साधनेला अग्रस्थान दिलें पाहिजे—वाचन नि मनोविकास यांना केवळ दुय्यम स्थान आहे. SABCL Vol 24 : Page 1270

*

साधनेंत बौद्धिक अभ्यासाचें स्थान :—

बौद्धिक अभ्यासांत गढून गेलें पाहिजे असें कोणावरहि मुळींच बंधन नाहीं. स्वतःची आवड म्हणून साधना झाली पाहिजे; नियम किंवा सक्ति आहे म्हणून नव्हे.

*

ध्यान व वाचन :—

प्रदीर्घ ध्यान करण्याची जर साधकाच्या अंगीं शक्ति असेल तर स्वाभाविकपणेंच साधक तें करील व वाचनाची त्यास विशेष मातब्बरी वाटणार नाहीं—मात्र तो अशा अवस्थेप्रत पोहोंचलेला असला पाहिजे कीं, त्याला प्रत्येक गोष्ट ही शाश्वत स्वरूपाच्या योगिक चेतनेचा भाग आहे असें वाटलें पाहिजे. बौद्धिक विकास, मनोविकास हें साधकाचें ध्येय नसून साधना

हेंच त्याचें ध्येय आहे. तथापि त्याला जर रिकामा वेळ असेल व त्याच्या मनाचा कल अभ्यासाकडे असेल तर साहजिकपणेंच वाचनांत अथवा कसल्यातरी अभ्यासांत तो वेळ खर्च करील.

SABCL Vol 24 : Page 1272

*

कांहीं साधकांना ध्यान करूं नका असें सांगण्यांत यतें; तर मग ध्यान करणें हें सर्वांना आवश्यक आहे असें कसें म्हणतां येईल ?

जे पुष्कळ ध्यान करूं शकतात त्यांच्यासाठीं प्रदीर्घ ध्यान. पण यावरून असें अनुमान निघत नाहीं कीं ज्या अर्थी प्रदीर्घ ध्यान करणें चांगलें त्याअर्थी कोणीहि दुसरें कांहींच करतां कामा नये.

*

मानसिक क्रियाशून्यता व निश्चल नीरवता :—

. . . . . मनानें कांहीं न करणें म्हणजे शांत मन किंवा निश्चल-नीरव मन नव्हे. निष्क्रियते मुळेंच मनाचे विचार यंत्रवत् चालू रहातात, एकाद्या विषयावर मनाची शक्ति केंद्रित होण्या-ऐवजीं विखुरलेली रहाते, इतकेंच.

*

मनाची शांति अथवा निश्चल-नीरवता याचा अर्थ मनाला कोणताच विषय ठेवावयाचा नाहीं, असा नव्हे.

*

वाचन आणि व्यक्तिविकास :—

व्यक्तीच्या वाढीस वाचन साह्य करतें कीं नाहीं हें वाचलेल्या विषयांच्या स्वरूपावर अवलंबून असतें. सर्वसाधारण असा कोणताच नियम सांगतां येणार नाहीं. काव्य किंवा नाटकें वाचावींत अथवा वाचूं नयेत असें कांहींच म्हणतां येणार नाहीं, कारण हें त्या त्या कवितेवर किंवा नाटकावर अवलंबून राहील; आणि हेंच इतरहि बाबतींत.

*

वाचनाच्या दोन पद्धती :—

अनेक ग्रंथ झरझर वाचून हातावेगळे करण्यानें वाचकाला भाषेच्या अभ्यासाच्या बाबतींत स्वातंत्र्य मिळतें, त्यांत सुलभता येते आणि भाषेचा परिचय वाढतो. उलट, तपशीलाचें बाब-तींत परिपूर्णता नि अचूकपणा येण्याच्या दृष्टीनें दुसरी पद्धत आवश्यक असते.

*

अभ्यासाचें महत्त्व :—

तुम्ही योग्य पद्धतीनें अभ्यास केलात व मनाला वळण लावणें आणि ज्ञानप्राप्ति करून घेणें हा तुमचा उद्देश असला तरच केवळ त्या अभ्यासास महत्व आहे.

*

अभ्यास आणि खरी निर्णयशक्ति :—

माहिती मिळविण्यासाठीं आणि स्वतःच्या ज्ञानाचें क्षेत्र विस्तृत करण्यासाठींच केवळ वाचन आणि अभ्यास यांचा उपयोग. परंतु एवढें करूनहि सारासार विवेक कसा करावा, मूल्य-मापन कसें करावें आणि घटनांच्या पाठीमागें व घटनांमध्यें असलेलें तथ्य कसें पहावें हें जर एकाद्याला माहीत नसेल तर वाचन व अभ्यास हें सारें निष्फळ होय.

*

पुस्तकी ज्ञान व बुद्धि :—

किती वाचलें यावर बुद्धिमत्ता ही अवलंबून नसते; बुद्धिमत्ता हा एक मनाचा गुणधर्म आहे. बुद्धीच्या कार्यासाठीं तिला ज्याप्रमाणें जीवनांतून विषय मिळतो त्याचप्रमाणें अभ्यासा-नेंहि तिला केवळ साधनसामुग्री मिळते. लिहितां वाचतां न येणारीं अशीं कांहीं माणसें असतात आणि तीं अनेक उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांहून बुद्धिमान् असून त्यांना जीवन आणि इतर गोष्टी यांचें अधिक चांगल्या प्रकारें आकलन असतें. या उलट चांगली बुद्धि वाचनानें अधिक प्रगल्भ होऊं शकते. याचें कारण वाचनानें तिच्या कार्यास अधिक साधनसामुग्री मिळते. अशा अभ्यासानें आणि अधिक व्यापक क्षेत्रांत तिला कार्य करावयास मिळाल्यानें ती विकास पावते. परंतु केवळ पुस्तकी ज्ञानास स्वतःचें असें खरें महत्व नाहीं, बुद्धीस मदतनीस म्हणून तें उपयोगांत आणलें पाहिजे. तथापि पुष्कळवेळां त्यानें मूर्खपणा व अज्ञानच वाढतें. अज्ञान वाढतें असें म्हणण्याचें कारण कीं घटनांच्या मागील खरा अर्थ जर पहातां येत नसेल तर घटनांचें नुसतें ज्ञान व्यर्थ आहे.

*

तर्कशास्त्र, विचारशक्ति आणि प्रत्यक्ष आचरण :—

तर्कशास्त्राच्या अभ्यासानें केवळ तात्त्विक बाजू तयार होतें. त्यामुळें विचार करण्याचें कांहीं नियम कळतात. पण ते नियम उपयोगांत कसें आणावयाचें हें तुमच्या बुद्धीचें काम आहे. ज्ञानाच्या अथवा कार्याच्या कोणत्याहि क्षेत्रांत एकादा माणूस मोठा विचारवंत असूनहि प्रत्यक्ष कृतीच्या बाबतींत तो मागें पडूं शकतो. युद्धशास्त्र विषयांत श्रेष्ठ दर्जाचा विचारवंत नि टीकाकार असलेल्या एकाद्या व्यक्तीस सैन्यावर अधिकारी नेमलें तर, योग्य प्रसंगांत तत्त्वांचा प्रत्यक्ष उपयोग करण्याचें सामर्थ्य नसल्यानें तो बहुधा सर्व लढायांत पराजय पावेल. त्याच-प्रमाणें एकाद्या तर्कपंडिताला सूक्ष्म खोल, दृष्टि नसेल, मनाची स्थिरता लाभलेली नसेल किंवा स्वतःच्या शक्तींचा उपयोग करीत असतांना परिस्थितीशीं जुळवून घेण्याची मनाची लव-चिकता नसेल तर विचारविषयक प्रश्न हाताळतांना तो सगळा गोंधळ करून टाकील. शिवाय हेंहि खरें आहे कीं, तर्कशास्त्र म्हणजे कांहीं विचाराचें संपूर्ण क्षेत्र नव्हे; निरीक्षण, उत्स्फूर्त ज्ञान, सहानुभूति आणि ज्ञानामध्यें अनेकांगिता ह्या गोष्टी अधिक महत्वाच्या आहेत.

*

मानसिक शिक्षणाचीं मूलतत्त्वें :—

मनाच्या शिक्षणांत पुढील गोष्टींचा समावेश होतो—वाचन, विविध गोष्टींविषयीं आकलन करून घेणें, सांगोपांग आणि बिनचूक माहिती प्राप्त करून घेणें, तर्कशुद्ध विचारसरणीचें वळण लावून घेणें, प्रश्नांच्या सर्व बाजू निर्विकारपणें विचारांत घेणें, अनुमानें आणि निष्कर्ष काढतांना घाई अथवा चूक न करणें, सर्व घटनांकडे स्पष्टपणें आणि समग्रतया पहाण्यास शिकणें.

*

भाषा शिकण्याच्या दोन पद्धती :—

भाषा शिकून काय करावयाचें आहे यावरच सर्व कांहीं अवलंबून असतें. केवळ वाङमय वाचण्याकरतां भाषा शिकावयाची असेल तर त्यासाठीं बिनचुकपणें वाचण्यास, उच्चार करण्यास आणि समजून घेण्यास शिकलें कीं पुरें आहे. जर भाषेवर संपूर्ण प्रभुत्व मिळवावयाचें असेल तर त्या भाषेंतील संभाषणपद्धति व लेखन या गोष्टी पूर्णपणें शिकल्या पाहिजेत.

*

साधनेंत वर्णनशक्तीचें स्थान :—

विचार करणारे मन कल्पनांचें जाळें विणत असतें, बहिर्मुख मन किंवा यंत्रवत् काम करणारें मन त्या कल्पनांना शब्दांनीं साकार बनवितें. तुमच्या ठिकाणचा हा अंश बहुधा पुरेसा विकास पावलेला नसावा. तसें पाहिलें तर शब्दांत वर्णन करून सांगण्याची देणगी क्वचितच व्यक्तींच्या ठिकाणीं आढळते. पुष्कळ लोकांच्या वर्णनपद्धतींत बोजडपणा असतो अथवा त्यांनीं विपुल लिखाण केलें तर त्यामध्यें व्यवस्थित रचना आणि शैली यांचा अभाव दिसून येतो. पण यास साधनेंत विशेष महत्व मुळींच नाहीं. साधनेंतील अनुभूति आणि झालेलें ज्ञान स्पष्टपणें व्यक्त करतां आलें म्हणजे झालें.

*

शिक्षण आणि वर्णनशक्ति :—

वर्णनशक्तिची गोष्टच निराळी. रामकृष्ण परमहंस हे अशिक्षित, अबुद्धिप्रधान असून देखील त्यांना झालेल्या ज्ञानाचें वर्णन ते इतके निर्दोष करीत कीं बुद्धीचे बृहस्पतिदेखील त्यांच्यापुढें विनीत झाले.

*

वर्णनशक्तीचा स्वीकार करण्याची पद्धति :—

ज्या आंतरिक उगमस्थानापासून वर्णनशक्ति सारख्या गोष्टी उगम पावतात त्या मूलस्रोताशीं संबंध प्रस्थापित केल्यानें वर्णन करण्याची शक्ति प्राप्त होते. स्थिर आणि निश्चल-नीरव मन असणें ही वर्णनशक्तीच्या अनिबंध प्रवाहास मोठीच मदत असते; तथापि अशा प्रकारची मनःस्थिति नसली तर चालणारच नाहीं असें नाहीं किंवा ही स्थितीच ती शक्ति आणते असेंहि नाहीं.

*

—श्रीअरविंद पत्र संग्रह खंड ४

विचार-शलाका

देवानें या जगास एक युद्धभूमि बनविली आहे आणि ती योद्धयांच्या पदाघातानें, संहाराच्या हाहाःकारानें आणि रणकंदनाच्या निनादानें भरून टाकली आहे. त्यानें ठरविलेलें मूल्य मोजल्याशिवाय तुम्ही त्याच्यापासून शांति हिरावून घेऊं शकाल काय ?

बलिदान, बलिदान, सदैव बलिदानच पण तें केवळ बलिदानासाठीं बलिदान नसून देव आणि मानवता यांसाठींच पाहिजे.

स्वार्थानें आत्मानाश होतो; त्याचा विनाश करा. मात्र आपल्या लोकसेवाव्रतानें इतरांचे आत्मे नाश पावणार नाहींत याची काळजी घ्या.

लोकसेवाव्रत म्हणजे बहुधा स्वार्थाचेंच गोजिरवाणें स्वरूप असतें.

★ ★ ★

क्षुद्रता आणि स्वार्थ हीं दोनच पापें अशीं आहेत, ज्यांची गय करणें मला कठीण दिसतें; पण हीं दोन्हीं जवळ जवळ सार्वत्रिक आहेत. म्हणूनच इतरांमध्यें असलेल्या या दुर्गुणांचा तिरस्कार न करतां स्वतःमधून मात्र त्यांचें निर्मूलन करा.

उदारता आणि उदात्तता म्हणजे आत्म्याचें नभोमंडलांतील इंद्रभुवनच. त्या.वना असलेला जीव म्हणजे अंधाऱ्या कोठडींतील कीटकच होय.

तुझे सद्‌गुण लोकांच्या स्तुतिकरतां व मानाकरतां असूं नयेत तर जे गुण तुझ्या पूर्णत्वास साह्यकारी असतील आणि तुझ्या स्वभावांत जे गुण असावेत अशी परमेश्वराची अपेक्षा असेल ते तुझ सद्‌गुण असावेत.

लोकसेवा, कर्तव्यपालन, आत्पेष्ट, स्वदेश आणि मानवता हीं आत्म्याचीं साधनें ठरत नसतील तर तीं त्याचीं बंधनेंच होत.

★ ★ ★

जुने सांचे मोडून टाका पण त्यांतील अंतःप्रेरणा व अंतःशक्ति सुरक्षित ठेवा; नाहींतर तुम्हांला भवितव्यच उरणार नाहीं.

क्रांतीनें जुन्याचे तुकडे तुकडे केले आणि ते विशाल कटाहांत वितळविले पण त्यांतून जें उद्‌भुत झालें तें नव्या तोंडवळ्याचें जुनेंच रूप.

जगांत यशस्वी अशा पांच सहाच क्रांती होऊन गेल्या आणि त्यांतीलहि बहुतेक सर्वच जवळ जवळ निष्फळच ठरल्या. तरी सुद्धां अशा महान् आणि उदात्त पराभवांतूनच मानवता प्रगत होत असते.

पूर्ण यशाच्या आभासावर विश्वास ठेवूं नकोस, तर यशस्वी झाल्यानंतरहि जेव्हां तुला असें दिसून येईल कीं अद्यापि पुष्कळच करावयाचें राहिलें आहे त्यावेळीं हर्षभरित हो आणि पुढें चल; कारण खरी पूर्णता प्राप्त होण्यापूर्वी दीर्घकाळ परिश्रम करावे लागतात.

ध्येय मार्गावरील पायरीलाच शिखर मानणें अथवा विश्रामस्थळीं अधिक काळ रेंगाळत रहाणें यापेक्षां तुम्हांला विमूढ करणारी दुसरी कोणतीच चूक नाहीं.

* * *

संन्यास दर्शविणारा विशिष्ट वेष आणि कांहीं बाह्य चिह्नें असतात म्हणून लोकांना असें वाटतें कीं त्यांना तो सहज ओळखतां येईल. पण जनकाच्या मुक्तावस्थेनें आपला डांगोरा कधींच पिटला नाहीं, उलट तिनें तर जगांतीलच वेष परिधान केला होता. तिचें अस्तित्व नारदाच्याहि लक्षांत येऊं शकलें नाहीं.

सामान्य माणसाचें जीवन जगत असूनहि मुक्तावस्थेंत रहाणें हें या जगांत अत्यंत दुष्कर आहे, पण तें दुष्कर आहे म्हणूनच त्यासाठीं झटलें पाहिजे आणि तें प्राप्त करून घेतलें पाहिजे.

जनकाचीं कर्में पाहिलीं तेव्हां देवर्षि नारदालाहि जनक हा विलासी आणि विषयलंपट आहे असेंच वाटलें. एकाद्याचें अंतरंग, त्याचा आत्मा जर तुम्ही पाहूं शकत नसलांत तर तो बद्ध कीं मुक्त हें तुम्ही कसें सांगूं शकणार ?

प्राप्त करून घेतलेल्या पातळीपलीकडील सर्वच गोष्टी मनुष्याला कठीण वाटतात आणि केवळ व्यक्तिगत प्रयत्नानें त्या असाध्य असतातहि. पण मानवांतील देवानेंच जर अंगावर घेतलें तर त्याच गोष्टी मनुष्याला एकदम अत्यंत सोप्या आणि साध्या होऊन जातात.

SABCL Vol 17 : Page 90

*

स्वार्थ हें एकच पाप आहे, क्षुद्रता हा एकच दुर्गुण आहे आणि द्वेष हा एकच गुन्हा आहे. इतर सर्व गोष्टींचें परिवर्तन चांगल्या गोष्टींत सहज करतां येईल पण हे मात्र दिव्यतेचे दुर्निवार विरोधक होत.

SABCL Vol 17 : Page 91

—श्रीअरविंद

कोणतीहि शिकवण जर संपूर्णतया अंतःकरणपूर्वक दिलेली असेल तरच ती लाभदायक ठरते; म्हणजेच ती देत असतांना प्रत्यक्ष जीवनांत उतरलेली पाहिजे, वारंवार उच्चारलेल्या शब्दांमध्यें, वारंवार व्यक्त केलेल्या विचारांमध्यें अंतःकरणपूर्वकता असूं शकत नाहीं.

——श्रीमाताजी

श्रद्धा

या भौतिक जगांत सर्वसामान्यापेक्षां कमी प्रतीच्या गोष्टी विपुल प्रमाणांत सांपडतात पण सर्वसामान्याच्या अतीत असेंहि कांहीं येथें आहे. अशा बाबतींत श्रद्धेचा प्रश्न बाजूला ठेऊन स्वतंत्र विचार करणाऱ्यानें (म्हणजे अनुमानाच्या त्रिपदीनें बांधून घेतलेल्या तार्किका-सारखे किंवा तथाकथित स्वतंत्र-विचारवाद्यांसारखें नव्हे) एकदम असें उद्गारतां कामां नये कीं 'अमुक एक बाब म्हणजे भोंदुगिरी! अमुक एक बाब म्हणजे असत्य!' आवश्यक असा अनुभव व ज्ञान प्राप्त होईपर्यंत त्यानें निर्णय देण्याचें स्थगित केलें पाहिजे. अज्ञानानें दिले-ला नकार आणि अज्ञानानें दिलेला होकार हीं दोन्हीं एकाच तोलाचीं.

*

आध्यात्मिक गोष्टींवर साधकाची श्रद्धा असावी अशी जेव्हां अपेक्षा असते तेव्हां अज्ञान-मूलक श्रद्धेची नव्हे तर ज्योतिर्मयी श्रद्धेची अपेक्षा असते; प्रकाशावरील श्रद्धेची अपेक्षा असते, तिमिरावरील नव्हे. शंकेखोर बुद्धिवादी लोक अशा श्रद्धेस 'अंध' हें विशेषण लाव-तात, कारण बाह्य रूपांच्या अथवा दिखाऊ घटनांच्या आधारानें चालण्यास अशी श्रद्धा तयार नसते; त्यांच्या पलीकडे असलेल्या सत्याचा शोध ती करीत असते, प्रमाण आणि पुरावा यांचा आधार तिला नको असतो. अशी श्रद्धा म्हणजे उत्स्फूर्त ज्ञान, अनुभूतीची केवळ प्रतीक्षा करणारें नव्हे तर अनुभूतिप्रत नेणारें उत्स्फूर्त ज्ञान. स्वतःची व्याधि स्वतःच बरी करण्यावर जर माझा विश्वास असेल तर कालांतरानें माझी व्याधि बरा करण्याचा मार्ग मी शोधून काढीनच. रूपांतरावर (transformation) जर माझी श्रद्धा असेल तर रूपांतरा-च्या पद्धती हुडकून काढून उघडकीस आणण्यांत माझ्या प्रयत्नांची इतिश्री होईल. पण जर कां मीं सुरुवातीस शंका घेतली आणि तसेंच पुढेंहि शंकेस पुष्टि देत गेलों तर साधनामार्गावर कितीसें अंतर चालून जाणें शक्य आहे?

*

श्रद्धा अनुभवावर अवलंबून नसते. अनुभवाच्या पूर्वींहि जें 'कांहीं' असतें ती श्रद्धा. जेव्हां एकादी व्यक्ति योगास प्रारंभ करते तेव्हां अनुभवाच्या जोरावर प्रारंभ करीत नाहीं, तर श्रद्धेच्या जोरावर. योग व आध्यात्मिक जीवन या बाबतींतच हें खरें आहे असें नाहीं, तर सर्वसामान्य जीवनांतहि असेंच असतें. सारे कर्तबगार पुरुष, शोधक-संशोधक, ज्ञान-निर्माते श्रद्धेच्याच आधारानें जात असतात; प्रयोग सिद्ध होईपर्यंत, अपेक्षाभंग, अपयश, असिद्धता, नकार यांना न जुमानतां त्यांचें उद्योग चालूंच रहातात; कारण आपणांस वाटतें तें सत्य आहे, त्यालाच अनुसरलें पाहिजे, तदनुसार वर्तलें पाहिजे अशी आंतरिक ग्वाही त्यांना मिळत असते. "अंधश्रद्धेनें चालणें अयोग्य नव्हे काय?" असा प्रश्न एकदां रामकृष्ण परमहंसांना विचारण्यांत

आला होता. त्यांनीं उत्तर दिलें, " असायची तर अंधश्रद्धाच असली पाहिजे." कारण श्रद्धा ही 'अंध' असते, ती 'अंध' नसेल तर तर्कसिद्ध अनुमान, प्रमाणानें पटलेली खात्री, अथवा निश्चित ठरलेलें ज्ञान, असें त्याचें स्वरूप असेल.

जें अजूनहि प्रकट झालेलें नाहीं, संपादन केलेलें नाहीं, किंवा ज्याचा साक्षात्कार झालेला नाहीं, त्याची आत्म्यानें दिलेली साक्ष म्हणजे श्रद्धा; मात्र त्यासंबंधी कांहींहि सूचक चिह्नें अथवा लक्षणें दिसत नसूनहि अंतर्यामींच्या ज्ञात्याला विशेषतः असें वाटत असतें कीं हेंच सत्य होय अथवा सर्वश्रेष्ठ प्रयत्नांनीं अनुसरण किंवा संपादन करण्याजोगें कांहीं असेल तर तें हेंच होय. मनामध्यें सुस्थिर, अढळ विश्वास नसला आणि प्राणशक्तीचें झगडणें, प्रतिकार करणें आणि नकार देणें चालू असलें तरीहि अशी आंतरिक श्रद्धा टिकू शकते. असा कोण योगी आहे कीं ज्याची योगसाधना अपेक्षा-भंग, अपयश, विश्वासलोप आणि अंधकार यांनीं कांहीं काळ, कधीं कधीं प्रदीर्घ कालहि आकुलित झालेली नसते ? आणि तरी देखील त्याला आधार देणारें असें कांहीं असतेंच. तें 'कांहीं' त्याला न जुमानतां पुढें पुढें जात असतें; कारण त्या 'कांहीं' चीं अशी भावना असते कीं, जें अनुसरलें तेंच सत्य होय—तें भावनेपेक्षांहि अधिक असतें, तें जाणलेलें असतें, अनुभवलेलें असतें, योगामधील मूलभूत श्रद्धा ती हीच. ती आत्म्याची स्वाभाविक श्रद्धा होय. भगवंताचें अस्तित्व आहे, केवळ भगवंताचेंच अनुसरण केलें पाहिजे आणि त्याच्याशीं तुलना करून पाहतां जीवनांत प्राप्तव्य असें अन्य कांहींहि नाहीं, ही ती श्रद्धा. माणसाचें ठायीं ही श्रद्धा असेल तर तो आध्यात्मिक जीवनास पात्र आहे; आणि मी असें म्हणेन कीं अशा व्यक्तीच्या स्वभावांत कितीहि विघ्नें असलीं, कसलेहि नकार आणि अडचणी असल्या, अनेक वर्षें त्याला झगडत रहावें लागलें तरी आध्यात्मिक जीवनांत अशा व्यक्तीला यश हें ठेवलेलेंच आहे.

"जर भगवंताचें अस्तित्व असेल आणि साधनेप्रीत्यर्थ जर त्याची हांक आली असेल, तर त्या हांकेच्या मागें आणि साधनेमधून त्याचे कांहीं मार्गदर्शन असलेंच पाहिजे आणि कितीहि अडचणी आल्या तरी तुम्ही तडीस जालच"—ही श्रद्धा विकसित करण्याची तुम्हांला गरज आहे. अर्थात् ही श्रद्धा तर्क आणि सर्वसाधारण ज्ञान यांस धरूनच आहे. अपयशसूचक आंतरिक ध्वनी अथवा उतावीळपणें, घाई करून त्याला सांथ देणारे भावनांचे सूर ऐकावयाचे नाहींत; 'साधन मार्गावर महान् संकटें आहेत म्हणून यश मिळणें अशक्यच किंवा भगवंतानें अजून दर्शन दिलें नाहीं म्हणून तो कधींच दर्शन देणार नाहीं' अशा विचारांवर विश्वास ठेवावयाचा नाहीं; तर एकाद्या महान् नि दुष्प्राप्य ध्येयावर मन केंद्रित केल्यावर प्रत्येकजण जी भूमिका घेतो कीं, "वाटेल त्या अडचणी येवोत, मी यशस्वी होईपर्यंत पुढें पुढेंच जाणार"—ही भूमिका घ्यावयाची. भगवंतावर श्रद्धा असलेली व्यक्ति यांतच भर घालून ठामपणें म्हणते, "भगवंताचें अस्तित्व आहेच. भगवंताचा जो शोध मी करीत आहे त्यांत मी कधींच अपयशी ठरणार नाहीं. भगवंताची भेट होईपर्यंत जें जें येईल त्या प्रत्येकास तोंड देऊन मी पुढें पुढेंच जाणार." SABCL Vol 23 : Page 572

★

—श्रीअरविंद

फुलांचें आध्यात्मिक कार्य

भगवंताचें पूजन करण्याचें, त्याला आत्मसमर्पण करण्याचें, मनोभाव निवेदन करण्याचें मनुष्याजवळ असलेलें सहजसुलभ, नैसर्गिक, गूढअर्थवाहक पूजनद्रव्य म्हणजे फूल. आपल्या नयनमनोहर रंगांनीं, मृदुकोमल स्पर्शानें, सुगंधित परिमलानें, सुमधुर मधूनें फुलें आपल्या सर्व इंद्रियांना रिझवितात. हीं फुलें म्हणजे भगवंताचें प्रसन्न स्मित घेऊन येणारे जणु संदेश-वाहक देवदूतच; परमेशाचा सर्वसमर्थ आध्यात्मिक मंत्र आपल्या आत्म्याला मूक भाषेनें निवेदन करणारीं प्रतीकें.

कोणता आध्यात्मिक संदेश हीं फुलें व्यक्त करतात हें त्यांच्याशीं एकरूप होऊन श्रीमाताजींनीं शोधून काढलें आहे. त्या त्या आध्यात्मिक गुणाचें द्योतक असें नांव सुमारें ६५० फुलांना त्यांनीं दिलेलें आहे. प्रसाद म्हणून ज्यावेळीं श्रीमाताजी फुलें देतात, त्यावेळीं साधकानें कोणत्या आध्यात्मिक गुणासाठीं तीव्र आकांक्षा धरावी हें सूचित करतात, शक्तीरूपानें तो गुण त्याला प्रदानहि करतात व त्याच्या आध्यात्मिक प्रगतीस साह्य करतात. साधकानें स्वतःच्या जाणीवेमध्यें तो गुण वाढविण्याचा, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा प्रयत्न करावयाचा असतो.

त्या फुलांचे आध्यात्मिक अर्थ क्रमशः देण्याचा विचार आहे. यावेळीं त्यांतील कांहींचे अर्थ येथें देत आहोंत.

(१)कमळ (पांढरें)––भागवत किंवा दिव्य चेतना. (२) गोकर्ण (निळी, दुहेरी) ––राधा-भाव, (३) गोकर्ण (पांढरी)––शुद्ध झालेलीं इंद्रियें. (४) तुळस––भक्ति. (५) सबजा––संयम, शिस्त, नियमबद्धता. (६) पारिजातक––अभीप्सा, उच्च आकांक्षा. (७) कडुनिंबाचीं पांढरीं फुलें––आध्यात्मिक वातावरण. (८) पेरूचें फूल––दृढनिश्चय. (९) हरळीचे तुरे––नम्रता, लीनता, विनय. (१०) गुलछबू (निशिगंध)––एकेरी––नव-निर्मिति. (११) निशिगंध––दुहेरी––सर्वांगपूर्ण निर्मिति. (१२) बाभूळ––पांढरें फल––ज्ञान. (१३) बाभूळ––पिवळें फूल––अतिमानस ज्ञान. (१४) कारल्याचें पिवळें फूल––मधुरता. (१५) मधुमालती (लाल चमेली)––विश्वासपात्रता, निष्ठा. (१६) बकुळ ––धीरता, बकुळ-फळ––कार्यसिद्धि. (१७) सोनटक्का––(पांढरा)––सच्चिदानंद. (१८) सोनटक्का (पिवळा)––अतिमानस सच्चिदानंद. (१९) लाल मंदार––धैर्य. (२०) सुपारीचीं फुलें––तांबडी––अतिमानस अमरत्त्व. (२१) सुपारीचीं फुलें पांढरी––सर्वांगीण अमरत्व. (२२) मरवा––आंतरिक नवजन्म (भौतिक नव्हे). (२३) पांढरा चांफा (पिवळा मध्य)––मानसिक (Psychological) पूर्णत्व––(पांच पाकळ्यांचीं नांवें ––पावित्र्य, भक्ति, समर्पण, एकनिष्ठा, श्रद्धा.) (२४) पांढरा चांफा (पांकळ्यांचीं टोंकें लाल झालेलीं)––भौतिक जीवनांतील मानसिक पूर्णत्व. (२५) पांढरा चांफा (मोठ्या पांकळ्या, संपूर्ण पांढरा)––परिपूर्ण मानसिक पूर्णत्व. (२६) सोनचांफा––अति-मानसिक आध्यात्मिक पूर्णत्व. (२७) कृष्णकमळ (निळें)––मौन, नीरवता, निःशब्दता. (२८) कृष्णकमळ (पांढरें)––संपूर्ण नीरवता. (२९) धोत्रा (पांढरा, लहान)––तपस्या. (३०) धोत्रा (पांढरा, दुहेरी)––सर्वांगांची तपस्या.

दिव्य जीवन

(क्रमशः)

आजच्या कठीण प्रसंगांतून मानवतेनें बाहेर निघण्यासाठीं आणखी एक पर्याय, आणखी एक मार्ग सुचविला जात आहे. सामान्य माणसांत जी बुद्धि आणि इच्छाशक्ति असते तिला अधिक प्रकाशानें, अधिक ज्ञानानें संपन्न करून तिची अशी वाढ करावी कीं, नव्या सामाजिकताप्रधान जीवनाला त्यानें आपणहून संमति द्यावी, आपला मी त्यानें समाजाचा ताबेदार करावा, उद्दिष्ट हें कीं, समाजाच्या जीवनाची व्यवस्था योग्य तऱ्हेनें व्हावी. सामान्य माणसाच्या अंतरंगांत आणि समाजांत हा जो मूलगामी फरक घडवून आणावयाचा तो कसा घडवून आणावयाचा, त्याला साधनें कोणतीं अशी विचारणा केली असतां दोन साधनांकडे बोट दाखविण्यांत येतें, दोन साधनें सुचविलीं जातात : माणसाच्या मनाला ज्ञान अधिक पुरवावें, अधिक चांगलें ज्ञान पुरवावें, त्याला योग्य कल्पना, योग्य माहिती पुरवावी, त्याला योग्य समाजघटक, योग्य नागरिक होण्याचें शिक्षण द्यावें; हें एक साधन. दुसरें साधन : समाजयंत्र अशा तऱ्हेनें नवें करावें कीं तें काटछाट करून माणसाच्या मानवतेला आजच्याहून चांगल्या नमुन्याची बनवूं शकेल आणि माणसावर ही जादू करून समाजाचे आजचे सारे प्रश्न सोडवूं शकेल. या बाबतींत एका काळीं कितीहि अपेक्षा केली जात असली तरी अनुभव असा आला आहे कीं केवळ शिक्षण आणि बौद्धिक कसरत माणसांत बदल करूं शकत नाहीं. व्यक्ति आणि समाजरूप व्यक्ति, समाजाचा मी आणि व्यक्तीचा मी, यांना अधिक चांगली माहिती पुरवणें; त्यांना स्वतःच्या स्वत्वाचें प्रभावी आविष्करण करतां येईल अशी अधिक कार्यक्षम, साधनसामग्री पुरवणें हें काम शिक्षण करूं शकते परंतु त्या 'मीं' त कांहीं बदल करूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें कोणत्याहि प्रकारचें समाजयंत्र मानवी जीवन, काटछाट करून पूर्णतासंपन्न करूं शकत नाहीं––खरी पूर्णता सोडा, जी कृत्रिम मनोरचना व समाजव्यवस्था पूर्ण समजली जाते ती देखील समाजयंत्राच्या द्वारां बनवली जाऊं शकत नाहीं. जडद्रव्य किंवा मानवीविचार समाजयंत्राच्या द्वारां विवक्षित नमुन्याचे करतां येतात; परंतु आमच्या मानवी अस्तित्वांत आणि जीवनांत जडद्रव्य आणि विचार दोन्हीं केवळ साधनें आहेत. आत्मा आणि प्राणशक्ति यांचीं तीं साधनें आहेत. समाजयंत्र, विशिष्ट नमुन्याचा आत्मा व विशिष्ट नमुन्याचा प्राण बनवूं शकत नाहीं; समाजयंत्र अधिकांत अधिक काय करील तर आत्म्याला व बुद्धीला जुलमानें वागवील, त्यांना इकडे तिकडे हलूं देणार नाहीं, एका जागेला खिळवून टाकील, निष्क्रिय करून ठेवील आणि प्राणशक्तीचें बाह्य कार्य नियंत्रित करील. हें परिणामकारक रीतीनें करावयाचें तर मन आणि प्राण यांच्यावर अपरिहार्यपणें इतकें दडपण आणावें लागेल कीं, त्यापासून एक तर समाजाची प्रगति थांबेल, विकासाच्या

आतांच्या टप्प्यावर तो स्थिर होऊन बसेल किंवा तो मागें मागें अथवा खालीं खालीं जाऊं लागेल. बुद्धिवाद करणाऱ्या मनाला तर्कशुद्ध व्यवहाराचा भाग म्हणून प्रकृतीच्या संकीर्ण आणि अनिश्चित हालचालींवर जय मिळविण्यासाठीं मन आणि प्राण (जीवन) यांचें यांत्रिकीकरण व नियंत्रण हा एकच मार्ग आहे, यांखेरीज दुसरा मार्ग नाहीं; आणि हें केलें कीं, मानवतेचा आत्मा आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं, आपला विकास न थांबतां चालू ठेवण्यासाठीं बंड करून उठेल, ज्या समाजयंत्रानें त्याला पकडींत घेतलें आहे त्याचा मोडतोड करून निकाल लावील. एकतर हें त्याला करावें लागेल किंवा त्याला समाजांतून पळ काढून जीवनावर पाणी सोडून आपले पाय आपल्या पोटांत घ्यावें लागतील, संसारत्याग करून एकांताचा आश्रय घ्यावा लागेल. मानवाचा आजच्या संकटांतून सुटण्याचा खरा मार्ग हा आहे कीं त्यानें आपला आत्मा शोधावा, आपली आत्मशक्ति शोधावी, आत्म्याचें विशिष्ट साधन शोधावें आणि हा शोध यशस्वी करून, मनाचें यांत्रिकीकरण आणि प्राणप्रकृतीची अज्ञानमय अव्यवस्थित धडपड या दोन्हीं गोष्टी टाळाव्या, त्यांच्या जागीं आत्मा, आत्म्याची शक्ति आणि साधनसामग्री यांस कामास लावावें. परंतु याप्रमाणें आत्म्याचीं आवरणें दूर करून त्याचा लाभ करून घेणें आणि त्याला व्यवहारांत अभिव्यक्त करणें, कार्यकारी करणें या क्रियेला लागणारी मोकळीक आणि स्वतंत्रता, बारकाईनें नियंत्रित आणि यंत्र-तंत्र केलेल्या सामाजिक जीवनांत जवळ जवळ नसणारच.

अशी एक शक्यता आहे कीं, जीवन आणि समाज या संबंधींच्या यांत्रिकतेच्या कल्पनांना विटून उलट खाऊन, मानवी मन परत धार्मिक कल्पनेचा आश्रय घेईल, आणि धर्मशासित किंवा धर्मसंगत समाज पसंत करील. परंतु संघटित धर्म व्यक्तीला आंतरिक उन्नतीचें साधन पुरवून त्या साधनाच्या कक्षेंत किंवा कक्षेबाहेर तिला आध्यात्मिक अनुभव मिळण्याचा मार्गहि उपलब्ध करून देण्यास समर्थ असला, तरी आजवर त्यानें मानवी जीवनांत आणि समाजांत खरा बदल घडवून आणलेला नाहीं; आणि त्याला हें करतां येणेंहि शक्य नव्हते, कारण समाजावर राज्य करतांना जीवनाच्या खालच्या हीन प्रतीच्या अंगांना त्याला तडजोड-बुद्धीनें मान्यता द्यावी लागत असे, मानवाच्या व समाजाच्या सर्वच्या सर्व जीवनांगांत आंतरिक बदल झालाच पाहिजे असा आग्रह त्याला धरतां येत नसे; त्याला एवढीच सक्ति करतां येई कीं धार्मिकांनीं धर्माचा श्रद्धापाठ असेल त्याला मान्यता द्यावी, धर्माची नैतिक आचारपद्धति असेल तिला शास्त्रोक्त संमति द्यावी, धर्मसस्था, धर्मविधि, धर्मसंस्कार मानावें आणि पाळावे. या कल्पनेप्रमाणें असलेला धर्म व्यक्तीला व समाजाला बाह्य दर्शनीं धार्मिक-नैतिक रंग-छटा देऊं शकेल, केव्हां केव्हां त्यांत आंतरिक अनुभूतीचा शक्तिसंपन्न गाभा टिकविलेला असेल तर, कांहीं एका मर्यादेपर्यंत, थोडीबहुत आध्यात्मिक प्रवृत्ति सर्व समाजांत तो पेरूं शकेल. परंतु मानववंशांत मौलिक स्वरूपांतर करणें त्याला शक्य नाहीं, मानवी जीवनाला पायाभूत असें नवें तत्त्व तो निर्माण करूं शकत नाहीं. मानवतेला आजच्या स्थितींतून वर, उच्चतर स्थितींत न्यावयाची तर, आजच्या मानवतेंतून उच्चतर मानवता निर्माण करावयाची तर, समग्र मानवी प्रकृति आणि समग्र मानवी जीवन यांना समग्रतेनें आध्यात्मिक वळण लावावयास हवें. मानवी जीवनाला आजच्या गोंधळांतून पार नेण्याचा वरील धार्मिक मार्गासारखा त्याच्या जातीचा दुसरा एक मार्ग कल्पिता येतो. तो असा कीं, आध्यात्मिक संपत्तीच्या सिद्धीच्या साक्षात्काराच्या

माणसांनीं समाजाचें मार्गदर्शन करावें. विशिष्ट श्रद्धा, पंथ किंवा साधना-संप्रदाय मान्य करणाऱ्या सर्वांचा बंधुसंघ किंवा ऐक्यमंडळ असावें; या संघानें किंवा मंडळानें जीवनाचें जुनें यंत्रतंत्र आपल्या प्रभावाच्या कक्षेंत आणून किंवा जीवनाचें नवें यंत्रतंत्र निर्मून समाज व समाज-जीवन आध्यात्मसंपन्न करावें. ही कल्पनाहि पूर्वीं व्यवहारांत आणून अजमावलेली आहे. हिला यश लाभलें नाहीं. एका नव्हे, अनेक धर्माच्या स्थापनेंत मूळ स्थापना करणारांची हीच कल्पना होती. परंतु मानवी मी आणि त्याची प्राणिक प्रकृति (वासनिक प्रकृति) फार जोरदार ठरली. या सर्व धर्मांतील उपरिनिर्दिष्ट धार्मिक कल्पना मनाच्या द्वारां मनावर संस्कार करून मानवी जीवनांत आध्यात्मिकता आणूं पहात होती; आणि मानवी मी व प्राणिक प्रकृति या प्रयत्नाला विरोध करीत होती. हा विरोध त्या धार्मिक कल्पनेला मोडून काढतां आला नाहीं. ती अयशस्वी झाली. याप्रमाणें मानवतेच्या आजच्या जीवनविषयक कठीण प्रश्नाला धार्मिक व केवळ व्यावहारिक उत्तरें जीं दिलीं जात आहेत त्यांचा विचार झाला. एकंदरींत निष्कर्ष असा निघतो कीं, मानवाच्या वैयक्तिक वा सामाजिक जीवनांत पूर्ण एकात्मता, अन्योन्यता व सुसंवाद नांदण्यासाठीं त्याच्या प्रकृतींत मौलिक बदल व्हावयास हवा. हा बदल घडवून आणणें सामान्य गोष्ट नाहीं. तो एक चमत्कार आहे. मानवाच्या विकासक्रमाचा, क्रमविकासाचा चमत्कार आहे. हा चमत्कार घडविण्यासाठीं पार्थिव प्रकृतींतून मानवाचा आत्मा विकासक्रमानें प्राणमनाप्रमाणें पूर्णपणें वर आला पाहिजे, आणि त्याचा स्वाभाविक प्रकाश व प्रभाव, प्रज्ञान व प्रभुत्व पूर्णपणें खालीं उतरलें पाहिजे. अर्थात् आत्म्याची अति-मानसिक पराप्रकृति मानवाला उपलब्ध झाली पाहिजे. इतकें झालें म्हणजे वरील चमत्कार घडतो कारण मानवाची त्याच्या कार्याला पुरी न पडणारी मानसिक व प्राणिक प्रकृति मौलिक रूपांतराच्या प्रक्रियेनें उन्नत करणें, उच्च पातळीवर नेणें हें कार्य पराप्रकृतीचें आहे. तें ती स्वाभाविकपणें करतें, तिच्या विकासाचा तो एक भाग आहे. शिवाय ही पराप्रकृति मानसिक व प्राणिक प्रकृतीची जागा घेते. अर्थात् जीं कामें त्या प्रकृतीकडून होऊं शकत नाहींत किंवा नीट होत नाहींत तीं कामें ही स्वतः करते. शेवटीं एकच गोष्ट सांगावयाची कीं वर सांगितल्याप्रमाणें आत्म्याचा पूर्ण उदय व पूर्ण अवतरण झाल्याशिवाय दुसऱ्या कोण-त्याहि मार्गानें मानवाचा जीवनविषयक आजचा कठिण प्रश्न सुटणार नाहीं.

प्रथम दर्शनीं मानवाच्या प्रकृतींत मौलिक बदल घडवून आणण्याचा आग्रह धरणें हें, '—मानवतेच्या पूर्णसुसंवादी जीवनाच्या आशाआकांक्षा पुऱ्या व्हावयास विकासाची वाटचाल दूर दूर, अति दूरच्या भविष्यकाळापर्यंत मानवानें करीत रहावयास पाहिजे'—,—हा ग्रह बरोबर आहे असे सांगण्यासारखे वाटतें. कारण आमचा मानसिक, प्राणिक, भौतिक स्वभाव जो आहे त्याच्या पलीकडे जाणें, पलीकडे जाण्याचा प्रयत्न करणें हें, मानवाची आजची स्थिति पाहतां, अतिशय उंच पातळीवरचा, अतिशय अवघड आणि आज अगदीं असाध्य असा खटाटोप करण्या-सारखें दिसतें. पण हें खरें असलें तरी, मानवी जीवनाचें रूपांतर करण्याची शक्ति, तें होण्या-ची शक्यता याच एका प्रयत्नांत आहे, हेंहि सर्वस्वी खरें आहे. मानवी स्वभावांत बदल न होतांहि मानवी जीवनांत खरा बदल होऊं शकेल अशी आशा करणें हेंहि बुद्धीला व अध्या-त्मालाहि न पटणारें आहे. अनैसर्गिक आणि अवास्तव कांहींतरी घडून यावें अशी इच्छा करण्यासारखें आहे, अशक्य चमत्कार घडून येण्याची अपेक्षा करण्यासारखें आहे. पण मानवी

स्वभावांत बदल होण्यासाठीं जें काय अवश्य आहे तें आमच्या पासून दूर दूर कांहीं तरी आहे, आमच्या अस्तित्वाला अगदीं परकें आहे; मूलतः असंभावव्य कोटींत तें आहे असेंहि नाहीं; जें काय विकसित करावयाचें आहे, उदयास आणावयाचें आहे, तें आमच्या अस्तित्वांत, स्वत्वांत, स्वभावांत आहे; त्याच्या बाहेर नाहीं. विकासशील प्रकृति आग्रह धरीत आहे तो एवढाच कीं, आमच्या अस्तित्वांत, स्वभावांत असलेला आत्मा, आम्हीं जागें होऊन जाणून घ्यावा, त्याचीं आवरणें दूर करून तो साक्षात् करावा, त्याचा व्यवहारांत आविष्कार करावा, त्याचें स्वतःचें ज्ञान, स्वतःची शक्ति, स्वतःचें स्वाभाविक करणोपकरणसाहित्य व्यवहाराला मोकळें करावें. हें जें पाऊल टाकावयास प्रकृति आग्रहानें प्रेरणा करीत आहे त्यासाठीं आजपर्यंतचा विकास हीच पूर्वतयारी आहे; मानवी भवितव्यासंबंधानें आजपर्यंत जे पेंचप्रसग निर्माण झाले त्यांतील दर एक प्रसगानें हें पाऊल टाकण्याची वेळ जवळ आणलेली आहे; कारण अशा प्रत्येक प्रसंगीं मानवाचा मानसिक आणि प्राणिक विकास, अशा एका स्थानाला पोंचतो कीं, तेथें मानवी बुद्धि आणि प्राणशक्ति कमाल मर्यादेपर्यंत ताणलीं जातात आणि मग दोनच पर्याय त्यांच्यापुढें असतात. कमालीच्या ताणामुळें त्यांनीं (प्राणशक्ति आणि बुद्धिशक्ति यांनीं) कोलमडून पडावें, इष्ट अप्राप्य ठरल्यानें पराभूत वृत्तीनें निष्क्रियतेंत बुडून रहावें, प्रगतीचें नांव सोडून देऊन शांत होऊन आराम करावा हा एक पर्याय आणि दुसरा, ज्या आवरणाच्या कठीणपणाशीं टक्कर देतांना त्यांना कमालीचा ताण सोसावा लागतो तें आवरण तोडून मोडून आपला मार्ग मोकळा करून घेऊन आपला प्रवास पुढें चालू करावा. मानवी जीवनांत आजवर आलेल्या कठीण पेंचप्रसगांत प्राणशक्ति व बुद्धिशक्ति यांची जी तारांबळ उडाली ती लक्षांत घेतां या शक्तीपेक्षीं वेगळीं थोर शक्ति, आत्मशक्ति मानवी स्वभावांत दाखल होऊन त्यांत बदल झाल्याप्रशिवाय मानवाला तरणोपाय नाहीं हें स्पष्ट होतें. तेव्हां आतां आवश्यकता आहे ती ही, कीं मानवतेची खरी प्रगति चालू मार्गानें, चालू दिशेनें यापुढें होणार नाहीं––अशा प्रगतीसाठीं मानवतेनें दिशा बदलणें, वेगळ्या दिशेला वळणें भाग आहे ही भावना कांहीं अथवा बऱ्याच लोकांत निर्माण व्हावी, ती वेगळी दिशा म्हणजे आत्मशक्तीच्या प्रभावानें मानवी स्वभावांत बदल घडवून आणणें होय अशी दृष्टि त्यांना लाभावी, हा बदल घडवून आणणें अतिशय निकडीचें आणि अटळ आहे असें त्यांना वाटावें, हा बदल शक्य आहे अशी जाणीव त्यांना व्हावी आणि आम्ही स्वतःमध्यें हा बदल घडवून आणूं व त्याचा मार्गहि शोधून काढूं असा निश्चय त्यांनीं करावा. या प्रकारची आवश्यक असलेली वृत्ति, या प्रकारचा आवश्यक असलेला मनाचा कल आज अस्तित्वांत आहे, आणि मानवाचें जगांतील भवितव्य संकटांत व संदेहांत पडेल त्या त्या प्रसंगीं मनावरील वाढत्या ताणामुळें ही वृत्तीहि वाढत राहील, हा कलहि वाढत राहील. अटीतटीच्या परिस्थितीच्या दडपणानें या व अशा संभाव्य परिस्थितींतून आपली सोडवणूक करून घेतलीच पाहिजे, ही निकडीची भावना आणि सोडवणुक होण्यास अध्यात्माखेरीज दुसरा कोणताहि उपाय नाहीं ही अगतिकतेची भावना विचारी माणसांत वाढत जाणार, ती अधिकाधिक अटळ व प्रभावी होत जाणार, यांत संशय नाहीं. या प्रकारची अगतिकतेची व निकडीची भावना मानवी हृदयांत उद्‌भवली अथवा उद्‌भवून निसर्गाला किंवा दिव्य सद्वस्तूला (ईश्वराला) हांक मारूं लागली कीं त्या हांकेला, त्या भावनेला निसर्गाकडून किंवा ईश्वराकडून कांहींतरी उत्तर केव्हांहि अवश्य मिळणारच. –श्रीअरविंद

साहित्य-सत्कार

अरविंद-दोहन–धार १ ली अध्यात्म विकास.
लेखक––सदानंद सुंठणकर. एकंदर पृष्ठसंख्या ४६० किंमत रु. ७

श्रीअरविंदांचें बहुतेक सर्व लिखाण इंग्रजी व बंगाली भाषेंत असून मराठी खेरीज इतर अनेक भाषांत त्यांचें थोडेबहुत वाङमय प्रसिद्ध झालेलें आहे. मराठी भाषेंतील वाङमयांत एक बहुमोल भर या नात्यानें रा. सुंठणकरांच्या या ग्रंथाचें आम्ही स्वागत करतो. हा ग्रंथ श्रीअरविंदांच्या 'दिव्य जीवन' या ग्रंथराजाचा संक्षिप्त परिचय करून देण्याच्या उद्देशानें लिहिलेला आहे. श्रीअरविंदांच्या तत्त्वप्रणालीचें नीट आकलन होण्यास पार्श्वभूमि तयार करण्याकरितां या ग्रंथाच्या पहिल्या 'हृद्गत' या भागांत लेखकानें महाराष्ट्रांतील साधुसंतांचीं शिकवण, भारतांतील अन्य प्रान्तीय विभूतींचें कार्य आणि भारतापुढील व पाश्चात्य राष्ट्रांपुढील आजची समस्या या विषयीं विवेचन केलें असून श्रीअरविंदांनीं ही समस्या कशी सोडविली आहे तें दाखविलें आहे. दुसऱ्या भागांत 'अध्यात्मविद्येचा' इतिहास व श्रीअरविंदांचें चरित्र थोडक्यांत देऊन झाल्यानंतर प्रत्यक्ष ग्रंथास प्रारंभ झाला आहे.

श्रीअरविंदांच्या 'दिव्य जीवन' ग्रंथाचें मध्यवर्ती विषयसूत्र ध्यानांत घेऊन सत्-चित्-आनंद अतिमानस, मानस, चैत्य-पुरुष, प्राण, पृथ्वी या ब्रह्मांडाच्या दोन गोलार्धांतील अस्तित्वांच्या निरनिराळ्या पातळींवरील जीवनांचें सांगोपांग विवरण करतांना त्याच्या अनुषंगानें ग्रंथांतील अन्य प्रकरणांचाहि लेखकानें संक्षेपतः परिचय करून दिला आहे. 'महत्त्वमापन' ह्या शेवटच्या प्रकरणांतील तौलनिक चर्चा अभ्यासकांच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची आहे. श्रीशंकराचार्य, बुद्ध, ज्ञानदेव, हेगेले, वर्गसाँ यांच्या तत्त्वप्रणालींची श्रीअरविंदांच्या तत्त्वज्ञानाशीं तुलना करून श्रीअरविंदांच्या विचारांतील वैशिष्टय व वेगळेपणा काय आहे हें स्पष्ट करण्याचा प्रयत्न त्यांत केलेला आहे.

मूळची इंग्रजी भाषा अत्यंत अवघड असल्यामुळें भाषांतरांतहि थोडा अधिक अवघडपणा आल्यास तें साहाजिकच आहे. परंतु श्रीअरविंदांनीं आपल्या ग्रंथांत वापरलेल्या संज्ञांना कांहीं विशेष अर्थ देऊन त्या वापरल्या असल्याकारणानें व परिभाषेंत एकता राहण्याच्या दृष्टीनें, अन्य प्रांतीय भाषांत प्रचलित होऊन राहिलेल्या संस्कृतोद्भव शास्त्रीय संज्ञा वापरल्या असत्या तर कदाचित् ग्रंथाला अधिक सोपेपणा आला असता.

ग्रंथामध्यें घातलेलें श्रीअरविंदांचें चित्र अगदींच सामान्य वाटतें. लेखकानें ग्रंथलेखनाकरितां घेतलेली मेहनत व केलेला खर्च पाहतां श्रीअरविंदांचा फोटो अधिक चांगला असावयास पाहिजे होता असें म्हणणें भाग आहे.

तरी, एवढे लहानसहान दोष सोडून दिले तर तत्त्वज्ञानाचें महाभारत शोभणाऱ्या 'दिव्य जीवन' या ग्रंथाचें अति परिश्रमपूर्वक मराठींत सार काढून लेखकानें महाराष्ट्र-सरस्वतीस एका नवीन अलंकारानें भूषविलें असून मराठी वाचकवर्गासाठीं, विशेषतः तत्त्वज्ञानाच्या अभ्यासूंसाठीं बहुमोलाचें व स्तुत्य असें कार्य केलेलें आहे यांत शंका नाहीं.

*

पुरुषार्थ :—वीर कथा विशेषांक जुलै किं. २ रु.

पुरुषार्थ मासिकानें नियतकालिक क्षेत्रांत एक विशिष्ट उच्च पातळी राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. दरवर्षी वाचकांच्या हातीं भरपूर मजकुराचा खास अंक देण्याचा उपक्रम पुरुषार्थानें कांहीं वर्षांपासून सुरू केला असून या वर्षीचा वीरकथांकहि नेहमींप्रमाणेंच वैशिष्टयपूर्ण आहे. या कथांमध्यें वीर-स्त्रियांचाहि समावेश केलेला असून त्या वाचतांना वाचकाचें मन आदरानें भरून जातें. 'वीर' या शब्दाची व्याप्ति विशेष व्यापक केल्यामुळें या अंकांत अनेक अप्रसिद्ध स्त्री-पुरुषांची स्फूर्तिदायक चरित्रें संक्षेपतः वाचावयास मिळतात. या कथा निवडतांना कालदृष्टीनें अथवा प्रांतदृष्टीनें संकुचित वृत्ति ठेवलेली नाहीं. राहिलेल्या वीरकथांची पुरवणी दिपवाळी अंकाला जोडण्यांत येणार असल्यानें, हे दोन्हीं अंक वाचल्यानंतर भारतीय वीर-वीरांगनांचें वाचकांना समग्र दर्शन होईल. "वैदिक काळापासून तों वैज्ञानिक काळाच्या चालूं क्षणापर्यंत अन्यायाच्या प्रतिकारार्थ, आर्तांच्या परित्राणार्थ, परदुःखविमोचनार्थ, शील संरक्षणार्थ, प्रतिज्ञा पालनार्थ व आपल्या मानबिंदूच्या इज्जतीप्रीत्यर्थ" ज्यांनीं ज्यांनीं शौर्य-वीर्य दाखविलें अशा आदर्श वीर-वीरांगनांचा कथा-संग्रह समाजासमोर ठेवल्याबद्दल संचालकांना कोणीहि धन्यवादच देईल.

*

आश्रमीय नवीन प्रकाशनें :—

संस्कृत–कथामञ्जरी—श्रीमाताजी. मूल्य–रूपकत्रयम्.

श्रीमाताजींच्या Belles Histoires ह्या फ्रेंच भाषेंतील गोष्टींच्या पुस्तकाचें संस्कृत रूपांतर. आत्मसंयम, सत्यनिष्ठा, दूरदर्शिता इत्यादि विविध गुणांवरील पौर्वात्य देशांतील प्राचीन आणि अर्वाचीन बोधप्रद कथा यांत संग्रहीत केलेल्या आहेत. भाषेच्या विशेष अभ्यासासाठीं व आकलन-सुलभतेसाठीं गोष्टीमध्यें आलेले वाक्यप्रचार, सुभाषितें इत्यादीचें 'विशेष विवरण' आणि शब्दकोश शेवटीं जोडण्यांत आला आहे. संस्कृत परीक्षांना नेमण्याच्या दृष्टीनें ह्या पुस्तकाची योग्यता मोठी आहे. संस्कृत कथावाङमयांतहि या पुस्तकाची भर उल्लेखनीय आहे.

*

गुजराथी :—

श्रीअरविंद जीवन (संक्षिप्त घटना प्रवाह)—ले. अंबालाल पुराणी किंमत रु. ४ आ. ८.

आजपर्यंत श्रीअरविंदांच्या जीवनावर जीं पुस्तकें लिहिलीं गेलीं त्यासर्वांहून हें 'श्रीअरविंद जीवन' घटनांच्या दृष्टीनें अधिक परिपूर्ण करण्याचा यत्न यांत केलेला आहे. श्रीअरविंदांशीं झालेले संवाद, त्यांचीं पत्रें, त्याचप्रमाणें Sri Aurobindo on Himself यांतून व कांहीं बंगाली मासिकांतूनहि आलेल्या माहितीचा उपयोग या चरित्र-लेखनांत करून घेतलेला आहे. श्रीअरविंद कलकत्त्याहून चंद्रनगरला व तेथून पांडीचेरीला कसे गेले यासारख्या कांहीं विवाद्य विषयावर लेखकानें अतिशय परिश्रमपूर्वक माहिती मिळवून वाचकांना पुरविली आहे. या चरित्रलेखनाची पद्धति नेहमींप्रमाणें विवेचनात्मक नाहीं. यांत कालानुक्रमानें

एकेक घटना सांगून, कांहीं ठिकाणीं त्यांची पार्श्वभूमि सांगितली आहे. असें असलें तरी चरित्र रसभरित व चित्ताकर्षक झालेलें आहे. श्री. पुराणी हे तीस-पस्तीस वर्षे आश्रमांत साधक म्हणून आहेत. शिवाय कांहीं वर्षे त्यांना श्रीअरविंदांचा प्रत्यक्ष सहवासहि लाभलेला आहे. त्यामुळें त्यांनीं लिहिलेलें हें चरित्र एकादृष्टीनें अधिकृत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रीअरविंदांचें जन्मस्थान, त्यांचें इंग्लडमधील व बडोदा येथील निवासस्थान व श्रीअरविंदांचें निरनिराळ्या वयांतील फोटो शेवटीं जोडण्यांत आल्यानें पुस्तकाची आकर्षकता वाढली आहे.

*

SRI AUROBINDO: Studies in the light of his thought.
By M.P. PANDIT. Price : Rs. 4-0-0 Pages 247

श्रीअरविंदांच्या दृष्टिकोनांतून लिहिलेल्या अनेक विषयावरील लेखांच्या या संग्रहांत पुष्कळसे लेख मुळांत 'ग्रंथ परीक्षणाच्या' स्वरूपांतील आहेत. ग्रंथांवरील अभिप्रायांचें मूल्य सामान्यतः केवळ तात्कालिक असतें परंतु या पुस्तकांतील विषय जीवनाच्या शाश्वत मूल्यांशीं निगडित असल्यानें त्यांचें महत्त्व चिरकाल टिकणारें आहे.

पुनर्जन्माचें तत्त्वज्ञान, मानवापुढील आजची समस्या, मानवी प्रगतीविषयीं विविध विचारप्रणाली, कम्युनिझम इत्यादि तात्त्विक विषयांबरोबरच भारतीय संस्कृति, भारतीय इतिहास, भारतीय राजकारण, नीतिशास्त्र, कला यांचा विविध दृष्टिकोनांतून परामर्श घेऊन शेवटीं श्रीअरविंदांचे या विषयांवरील मार्गदर्शक विचार वाचकांपुढें मांडलेले आहेत. हिंदुधर्म, जैनधर्म, वैदिक काव्य, श्रीकृष्णाचें जीवन, श्री रामकृष्ण परमहंसांची शिकवण, महात्मा गांधींचें तत्त्वज्ञान आणि मेहेरबाबांचा उपदेश इत्यादि विषयांचाहि अंतर्भाव या ग्रंथांत झालेला आहे. श्रीअरविंदांची अमर वाङमयसृष्टि, त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्व, सर्वांगपूर्ण योगसमन्वयाचें प्रणेते या नात्यानें त्यांचें आद्य स्थान आणि मानवजातीच्या उद्धारार्थ त्यांनीं केलेलें प्रचंड कार्य यांचें दिग्दर्शन यांत आहे.

लेखांची भाषा समृद्ध, प्रभुत्वपूर्ण आहे. विषय आणि कल्पना उदात्त आहेत, लेखनशैली स्पष्ट, सोपी पण प्रभावी आहे. श्रीअरविंदांचा योग व तत्त्वज्ञान यांची यथार्थ कल्पना येण्यास, श्रीअरविंदांच्या शिकवणीचें मूलभूत सिद्धांत आकलन होण्यास व ते आत्मसात् करण्यास या ग्रंथाचें वाचन निश्चितच साह्यभूत होईल.

*

आश्रम-वृत्त

(संक्षिप्त वार्षिक समालोचन)

आंतरराष्ट्रीय फोटो प्रदर्शन :—

१५ ऑगस्ट ५६ ला पांडीचेरी आंतरराष्ट्रीय फोटोग्राफिक् द्वितीय प्रदर्शनाचें उद्‌घाटन झालें. आश्रमाच्या फोटोग्राफी विभागानें नियोजित केलेलें हें प्रदर्शन, सागरतीरावरील आमच्या खास प्रदर्शन-भवनांत फारच लोकप्रिय झालें. लोकांचा वाढता आग्रह बघून अशा प्रकारचें प्रदर्शन प्रत्येक वर्षीच भरवावयाचें असें ठरलें. या वर्षी निरनिराळ्या ३८ देशांतून १४०० प्रवेशिका आल्या होत्या.

२४ नोव्हेंबर :—श्रीअरविंदांच्या सिद्धिदिनानिमित्त दर्शन प्रसंगीं श्रीमाताजींनीं खालील संदेश दिला—"काळाची क्षिति न बाळगतां, दिगंताची भीति न धरतां, अग्निदिव्याच्या ज्वाळांनीं पुनीत होऊन, वर उठून, आमच्या ध्येयसिद्धीकडे—अतिमानस विजयाकडे—आम्ही कोठेंहि न थांबतां उड्डाण करीत जाऊं."

नाटचगृह :—नवीनच विकत घेतलेल्या भव्य आवारांत, रात्रंदिवस खपून बांधलेल्या नवीन नाटचगृहाचें उद्‌घाटन १ डिसेंबरला झालें. १ व २ डिसेंबरला शाळेचा वार्षिकोत्सव होत असतो. नाना प्रकारच्या अद्ययावत् साधनांनीं सज्ज केलेल्या या विशाल नाटचगृहांत या वर्षी पुढील कार्यक्रम झाला—

१) देवांचा गर्वपरिहार. (उपनिषदावर आधारलेलें एक भाव-नाटच)—संस्कृत.

२) मृतात्म्यांचें वार्तालाप (श्रीअरविंद लिखित)—इंग्रजी.

३) सत्यशिखरावर आरोहण (श्रीमाताजीकृत) —फ्रेंच.

२ डिसेंबर :—खेळाच्या मोठ्या मैदानावर शारीरिक प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम. विशेषत: रशियन आलिंपिक विजेत्यांनीं गतवर्षीच्या आपल्या आश्रमभेटींत शिकविलेल्या, तसेंच अमेरिकेहून आणलेल्या कांहीं खास साधनसामुग्रीच्या साहाय्यानें केलेलीं नवीन, आकर्षक व यशस्वीं प्रात्यक्षिकें.

३ डिसेंबर :—विश्वविद्यालय केंद्राच्या उद्यानांत श्रीमाताजींच्या हस्तें बक्षीसवितरण सभारंभ. शाळेंतील विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रकें याच वेळीं दिलीं जातात.

५ व ९ डिसेंबर :—श्रीअरविंदांचा महासमाधि दिन श्रीमाताजींच्या उपस्थितींत शांत ध्यानधारणेनें पाळला गेला.

२५ डिसेंबर :—दिवसभराच्या जोरदार वृष्टीमुळें या वर्षी 'ख्रिस्तमस ट्री' व नाताळाचे सर्व उपहार खाऊ वगैरे हॉलमध्यें ठेवावे लागले. त्यामुळें त्या दिवसाच्या आनंदावर कांहीसें पाणी पडल्यासारखें झालें. बाकी सर्व कार्यक्रम उत्साहानें पार पडलाच.

याच सुमारास बाहुल्यांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें. देशोदेशींच्या विविध प्रकारच्या बाहुल्या, ख्रिस्तमसची सामाजिक व धार्मिक दृश्यें, मोठमोठीं पर्वत-दृश्यें, हिमदृश्यें, पऱ्यांची

भूमि, प्राणिसंग्रहालय, तसेंच निरनिराळ्या देवदेवता यांच्या आकर्षक बाहल्या सुंदर रीतीनें सजविल्या होत्या.

याच महिन्यात आंतरराष्ट्रीय स्नायुबलसंवर्धन स्पर्धा विजेते श्री मनतोष राय 'विश्वश्री' (Mr. Universe class III 1951) हे येऊन गेले. त्यांनीं आश्रमांतील व्यायामपटूंना आपलें कसब शिकविलें व खास उभारलेल्या स्टेजवर, अनेक आश्चर्यकारक प्रात्यक्षिकें त्यांनीं करून दाखविली. त्यावेळीं आश्रमांतील व्यायामपटूंनीहि असेच कांहीं प्रयोग करून दाखविले.

१ जानेवारी १९५७ :—नूतन वर्षदिनीं श्रीमाताजींच्या हस्तें नववर्षसंदेश वितरण समारंभ झाला. त्यांनीं नववर्षीं चिंतनार्थ दिलेला संदेश—

> "अशुभ शक्तीपेक्षां अधिक महान् अशी शक्तीच केवळ विजयी होऊं शकेल. सुळावर चढविलेला नव्हे, तर प्रतिष्ठा पावलेला तेजोमय देहच जगाला वांचवील."

६ जानेवारी :—विश्वविद्यालयाचा वार्षिकोत्सव. विद्यार्थी व शिक्षक यांनीं तयार केलेला छोटासा सुंदर कलात्मक कार्यक्रम विश्वविद्यालयाच्या उद्यानांत पार पडला. तसेंच विश्वविद्यालयाच्या नवीन कलाविभागाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलाकृती श्रीमाताजींनीं पाहिल्या.

२१ फेब्रुवारीला :—श्रीमाताजींनीं आपल्या वयाच्या ८० व्या वर्षांत पदार्पण केलें. या पुण्यपावन दिवसाच्या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ अनेक कार्यक्रमांचें आयोजन करण्यांत आलें.

भोजनशालेंत नवीन स्वयंपाकगृहाचें उद्घाटन झालें. 'दीप्ति' नांवाचें कानडी त्रैमासिक सुरु झालें. विश्वविद्यालय ग्रंथालयांतील मध्यवर्ति दिवाणखान्यांत श्रीमाताजींच्या संस्कृत, बंगाली, चिनी, जपानी, फ्रेंच, इंग्रजी, हिब्रु इत्यादि भाषांतील त्यांच्या स्वतःच्या जुन्या हस्तलिखितांचें प्रदर्शन ठेवलें होतें. डॉ. के. एल्. कोठारी यांच्या १९१ फोटोग्राफ् चें 'आश्रम फोटोग्राफी' नें आनच्या प्रदर्शन-भवनांत आयोजित केलेलें प्रदर्शन मांडलें होतें.

सकाळीं ६-१५ ला बाल्कनी दर्शन. १० ला श्रीमाताजींचा आशीर्वादग्रहण विधि.

दुपारीं ४ वाजतां पांढऱ्या शुभ्र गणवेषांत १००० आश्रमवासियांनीं आबालवृद्ध स्त्रीपुरुषांसह बॅंडच्या निनादांत श्रीमाताजींना दिलेली वंदना आणि नंतर फार दिवसांपासून सर्वांना अपेक्षित असलेल्या पोहोण्याच्या तलावाचें उद्घाटन. हा तलाव बांधतांना सर्व अद्यावत् सुधारणा त्यांत समाविष्ट केल्या आहेत. पाण्याच्या आंतील फोटो घेण्याचीहि सोय या तलावांत आहे.

सायंकाळीं ६ वाजल्यापासून आश्रमाच्या नव्या नाटचमंदिरांत अल्पोपाहारानें सुरुवात होऊन 'Dawn and the Dragon' हें नाटक यशस्वीरीतीनें पार पडलें. यांत लेखक, कलाकार, अभिनयपटु वगैरे सर्वच कामें प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं केलीं होतीं, हें त्याचें एक वैशिष्टय होतें.

आयुर्वेदिक दवाखान्याचें उद्घाटन हा सुद्धां या वर्षीचा विशेष म्हणावा लागेल. आयुर्वेदीय औषधि-निर्माण विभागहि या दवाखान्यास जोडलेला आहे.